

कहाणी ही संतांची

दत्ता जोशी



कहाणी ही संतांची

ज्ञानेश्वर, नामदेव, चोखोबा, सेना, निवृत्तीनाथ

दत्तात्रय नागेशराव जोशी

पुरस्कार

गो. नी. दांडेकर

प्रथमावृत्ती : जून १९८६

प्रकाशक : शशिकांत गोविंद कुलकर्णी
महाराष्ट्र ग्रंथ भांडार, महाद्वार रस्ता, कोल्हापूर ४१६००२

मुद्रक : नीलांबरी श. कुलकर्णी
सेवा मुद्रणालय, १६७ बी, विद्यापीठ रस्ता, कोल्हापूर ४१६००२

मूल्य दहा रुपये

छोटे पुस्तक–

मोठा आशीर्वाद !

माझे मित्र श्री. दत्तात्रेय नागेशराव जोशी यांनी 'कहाणी ही संतांची' या नावाचे एक लहानसे पुस्तक लिहिले आहे. ज्ञानोबानी म्हटले तसे
'जैशी दीपकळिका धाकुटी । परि बहु तेजाते प्रगटी ॥'
तसे हे लहानसे पुस्तक आहे. यात त्यानी श्री ज्ञानेश्वर, नामदेव, चोखोबा, सेना न्हावी, निवृत्तीनाथ आदि संतांची शब्दचित्रे रेखाटली आहेत.

ही शब्दचित्रे काढीत असता त्यानी त्या त्या संताच्या वाङमयाचे कसे सूक्ष्म अध्ययन केले आहे, याचा जाणकारास प्रत्यय येतो. हे अध्ययनही त्यानी बहुकाळ केले असले पाहिजे हे सहजगत्या ध्यानी येते. चांगली प्रसादपूर्ण भाषा, उत्तम शैली, विपुल अवतरणे अशा गुणांनी हे लहानसे पुस्तक नटले आहे. हे पुस्तक वाचल्यावर श्री. जोशी यांचे हातून असेच आणखी साहित्य निर्माण होवो अशी इच्छा मनी निर्माण होते.

परमेश्वर श्री. जोशीना अशी बुद्धी आणि बळ देवो.
इति ।

'मानसी'
तुळसीबागवाले कॉलनी
पर्वती, पुणे ९
दि. ९–५–१९८६

गोपाळ नीळकंठ दांडेकर

मनोगत

" कहाणी ही संतांची " हे पुस्तक आपल्या हाती देताना साफल्याचा एक अनामिक आनंद मला होतो आहे. आजच्या धावपळीच्या आणि अस्वस्थ जीवनात आपण मनःस्वास्थ्य हरवून बसलो आहोत आणि मन:शांतीसाठी धडपडतो आहोत. 'प्रेयस्' च्या मागे लागलेले आपण जीवनातले हे दुष्टचक्र भेदू का अशा संभ्रमावस्थेत जीवन व्यतीत करीत आहोत.

या संतांच्या जीवनचरित्रानी मला हे दुष्टचक्र भेदून 'श्रेयस्' कडे जाण्याची प्रेरणा दिली आहे ती वाटचाल करीत असता मला जो आनंद लाभला त्यामध्ये इतरानासुद्धा वाटेकरी करावे म्हणून हा पुनर्लेखनाचा प्रयत्न केला.

या कहाण्या यापूर्वी 'तरूण भारत,' पुणे, 'पुढारी' कोल्हापूर आणि 'तरूण भारत' बेळगाव मधून त्या त्या समयी प्रसिद्ध झाल्या होत्या. वाचकांचा त्या संदर्भात चांगला प्रतिसाद लाभला होता म्हणून या कहाण्या पुस्तकरुपाने एकत्रित केल्या आहेत.

या पुस्तकाच्या संदर्भात आदरणीय अप्पा (गो. नी. दांडेकर) यानी ते आपल्या लेखनांत, आपल्या व्यापात अत्यंत व्यग्र असताही वेळातवेळ काढून मला शुभाशीर्वाद दिले आहेत. त्यानी हा जो अनमोल ठेवा दिला आहे त्याबद्दल काय बोलावे ? ते 'शब्देवीण संवादिजे' अशा स्वरूपाचे आहे. आदरणीय अप्पांच्या वात्सल्याला सीमाच नसते. त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे एवढेच माझ्या हाती आहे.

मुद्रण, प्रकाशन संदर्भात माझे मित्र प्राध्यापक शशिकांत कुलकर्णी यानी सारी जबाबदारी उचलली असल्याने त्याना धन्यवाद देतो.

प्रस्तुत पुस्तकात जे चांगले असेल ते 'माऊलीं'चे ! आणि न्यून असेल ते माझे, असे म्हणून मुद्रण दोषाबद्दल 'क्षमस्व' असे म्हणतो.

'श्री वसिष्ठाश्रम' निपाणी (बेळगाव)
वैशाख वद्य पंचमी शके १९०८
दिनांक २८ मे १९८६

स्नेहांकित

क्षमस्व

कहाणी वाचण्यापूर्वी मुद्रणदोष सुधारून घ्यावेत ही विनंती.

पृष्ठ	ओळ	दोष	सुधारणा
३	२०	समवायपरी	समवायपटी
१५	२४	महार	महादा
१८	४	विभूतीमूळे.	विभूतीमुळे म्हणून
१८	५	म्हणून मी ?	मी ?
२०	९	पै व्यामोहाचिये । शेजे	पै व्यामोहाचिया शेजे
२०	२५	वर	वरं
२०	२७	परब्रह्मलिंग	परब्रह्मालिगं
२८	३	क्षमी	क्षणी
२९	२३	सब वेर	सब वेद
२९	२५	वकुंठनाथ	वैकुंठनाथा
३२	४	पूच्छो	पूछो
३४	११	वर्षानी	दिवसानी
४४	१	असमंतात	आसमंतात
४६	८	कपट	कष्ट
४७	२३	कूप	कूस
५३	१३	महंमह	महंमद
५३	२५	व कबीराचे गुरुबंधू रामानंद स्वामींचे	रामानंद स्वामींचे
५४	१७	रवन्या	खन्या
५६	१२	'सेना' व	सेनावर
५६	१४	एकदा	एकादा
६१	२	बामली	बाणली
६१	२१	वाटून	चाटून
६२	१९	वैश्णव	वैष्णव
६४	७	सिपला	सिणला
६४	१४	इजामत	इजामत
७७	२१	उक्ताई	मुक्ताई

'श्रे य स्' कडे
वाटचाल करण्यास सहाय्यभूत झालेली
माझी अर्धांगिनी
सौ. सु ल भा
हिला प्रेमपूर्वक

गु रु दे व

अनुक्रम

१)	ज्ञानेश्वर	१
२)	नामदेव	१९
३)	चोखोबा	३२
४)	सेना	५२
५)	निवृत्तीनाथ	६५

मी, एक साक्षी !

ज्ञानेश्वर

होय,

मी साक्षी आहे.

तसाच तो सिद्धेश्वरही... !

आत्ताच घडलाय इतक्या स्पष्टपणे मला तो प्रसंग आठवतोय.

सारं सारं आठवतोय अन् मनी साठवतोय.

तसा उरीं हरवून बसतोय.

किती वर्षे झाली याची खंत नाही.

किती विस्मरणं घडली याचा खेद नाही

या खेद खंताच्या पलीकडे एक कांहींतरी आहे,

त्याला काय म्हणावे हेच उमगत नाहीं.

उरी एक अनामिक आनंद ओसंडतोय.

तो आनंद आहे एका विचाराचा–
‘ साऱ्या प्रसंगाचा मी साक्षी आहे याचा ’ मला सारं आठवतंय ते–
‘ याच परिसरात एका रम्य सायंकाळी एक प्रसन्न वदनी तरुण आलेला. त्या सायंकाळी तो तरुण इथं, माझ्या सन्निध आला. क्षणभर थबकला आणि पुनः उठून शांतचित्ताने त्यानं सिद्धेश्वराचं दर्शन घेतले. ’

सिद्धेश्वराच्या दर्शनाने तो पुलकित झाल्याचा भास मला झाला. अन् अहो आश्चर्यम्, अंमळशाने तो माझ्यापाशी येऊन विसावला.

तसे फारच थोडे लोक इकडे येत आणि विसावत. पण कां कोण जाणे या तरुणाविषयी उगीचच आत्मीयता वाटू लागली होती.

तो नित्य नेमाने इथं येत राही. संन्यस्तवृतीनं राहणाऱ्या या तरुणाविषयी उगीचच आपले कुतूहल वाटू लागले. अन् एके दिवशी कळले, हा तर पैठणपासून चार कोसावर असणाऱ्या आणि बीडचे देशाधिकारी असणाऱ्या त्र्यंबकरावांच्या गोविंदरावाना त्यांच्या वयाच्या पंचावन्नाव्या वर्षी झालेला मुलगा !

आयुष्याच्या सायंकाळी झालेल्या या मुलाचं लक्षण वैराग्यवृत्तीचं आहे असं गोविंदरावाना दिसू लागलं होतं.

तसं दिसताच गोविंदरावास क्षणभर वेदना होत. पण त्या विसरून ते विठ्ठलास उपदेश करीत आणि सारा भार देवावर टाकून मोकळे होत.

असे हे विठ्ठलपंत तरूण होते. माझ्या संपर्कात आलेले विठ्ठलपंत मला सोज्वळ, सात्विक वाटले. सिद्धेश्वराच्या दर्शनाला येणाऱ्या सर्वांचं लक्ष यांच्याकडे न कळत जाई. पण हा तरुण अगदी अलिप्त. आपल्याच स्वानंदात मग्न !

सिद्धोपंत कुलकर्णी हे सारे न्याहाळीत होते. मनोमनी आडाखे बांधीत होते.

त्यांना आपल्या सुपुत्रीसाठी हा तरुण 'वर' म्हणून योग्य वाटत होता. पण पुढे काय ? असा प्रश्नही त्यांना भेडसावीत होता.

शेवटी मनाचा निश्चय करून सिद्धोपंत कुलकर्णी या तरुणास भेटले आणि त्यांनी त्यांच्यापुढे विवाहाचा प्रस्ताव मांडला.

पण हा ' पुरुष ' बधला नाही.

या पुरुषाला संसारात गुंतायचे नव्हते,

परंतु नियती थोडीच स्वस्थ बसणार ?

' प्रकृती ' संपूर्ण जागी होती.

सिद्धोपंतानी विवाहाचा प्रस्ताव मांडताच विठ्ठलपंतानी नकार देऊन आपला मनोदय स्पष्ट केला असला तरी तसं घडायचं नव्हतं.

'प्रकृती'नं 'पुरुषा'ला स्वप्नांत येऊन सांगितलं,

भक्ती आणि ज्ञान । वैराग्य आवडी ।
हे वसती उघडी । तुझ्या अंगी ।।
मूर्तीमंत चारी । जन्मती इच्या उदरीं ।
म्हणोनी स्वीकारी । आज्ञा माझी ।।

त्या रात्रीने अप्रूप घडवलं.

सकाळी विठ्ठलपंतांच्या लक्षात आले.

तरी हेची प्रकृती किरीटी ।
मी स्वकीया सहजे अधिष्टीं ।
तेथ तूं समवायपटी ।
जेवी विणावणी दिसे ।।

सिद्धोपंताना दिलेला नकार मागे घेतला गेला.

आणि त्यामुळे सिद्धोपंत खूपच सुखावले.

त्यांची कन्या उजवली गेली.

तो आनंद आहे एका विचाराचा–

'साऱ्या प्रसंगाचा मी साक्षी आहे याचा' मला सारं आठवतंय ते–

'याच परिसरात एका रम्य सायंकाळी एक प्रसन्न वदनी तरुण आलेला. त्या सायंकाळी तो तरुण इथं, माझ्या सन्निध आला. क्षणभर थबकला आणि पुन: उठून शांतचित्ताने त्यानं सिद्धेश्वराचं दर्शन घेतले.'

सिद्धेश्वराच्या दर्शनाने तो पुलकित झाल्याचा भास मला झाला. अन् अहो आश्चर्यम्, अंमळशाने तो माझ्यापाशी येऊन विसावला.

तसे फारच थोडे लोक इकडे येत आणि विसावत. पण कां कोण जाणे या तरुणाविषयी उगीचच आत्मीयता वाटू लागली होती.

तो नित्य नेमाने इथं येत राही. संन्यस्तवृत्तीनं राहणाऱ्या या तरुणाविषयी उगीचच आपले कुतूहल वाटू लागले. अन् एके दिवशी कळले, हा तर पैठणपासून चार कोसावर असणाऱ्या आणि बीडचे देशाधिकारी असणाऱ्या त्र्यंबकरावांच्या गोविंदरावाना त्यांच्या वयाच्या पंचावन्नाव्या वर्षी झालेला मुलगा !

आयुष्याच्या सायंकाळी झालेल्या या मुलाचं लक्षण वैराग्यवृत्तीचं आहे असं गोविंदरावाना दिसू लागलं होतं.

तसं दिसताच गोविंदरावास क्षणभर वेदना होत. पण त्या विसरून ते विठ्ठलास उपदेश करीत आणि सारा भार देवावर टाकून मोकळे होत.

असे हे विठ्ठलपंत तरूण होते. माझ्या संपर्कात आलेले विठ्ठलपंत मला सोज्वळ, सात्विक वाटले. सिद्धेश्वराच्या दर्शनाला येणाऱ्या सर्वांचं लक्ष यांच्याकडे न कळत जाई. पण हा तरुण अगदी अलिप्त. आपल्याच स्वानंदात मग्न !

सिद्धोपंत कुलकर्णी हे सारे न्याहाळीत होते. मनोमनी आडाखे बांधीत होते.

त्यांना आपल्या सुपुत्रीसाठी हा तरुण 'वर' म्हणून योग्य वाटत होता. पण पुढे काय ? असा प्रश्नही त्यांना भेडसावीत होता.

शेवटी मनाचा निश्चय करून सिद्धोपंत कुलकर्णी या तरुणास भेटले आणि त्यांनी त्यांच्यापुढे विवाहाचा प्रस्ताव मांडला.

पण हा ' पुरुष ' बधला नाही.

या पुरुषाला संसारात गुंतायचे नव्हते,

परंतु नियती थोडीच स्वस्थ बसणार ?

' प्रकृती ' संपूर्ण जागी होती.

सिद्धोपंतानी विवाहाचा प्रस्ताव मांडताच विठ्ठलपंतानी नकार देऊन आपला मनोदय स्पष्ट केला असला तरी तसं घडायचं नव्हतं.

'प्रकृती'नं 'पुरुषा'ला स्वप्नांत येऊन सांगितलं,

> भक्ती आणि ज्ञान । वैराग्य आवडी ।
> हे वसती उघडी । तुझ्या अंगी ॥
> मूर्तीमंत चारी । जन्मतीं इच्या उदरीं ।
> म्हणोनी स्वीकारी । आज्ञा माझी ॥

त्या रात्रीने अप्रूप घडवलं.

सकाळी विठ्ठलपंतांच्या लक्षात आले.

> तरी हेची प्रकृती किरीटी ।
> मी स्वकीया सहजे अधिष्ठीं ।
> तेथ तूं समवायपटी ।
> जेवी विणावणी दिसे ॥

सिद्धोपंताना दिलेला नकार मागे घेतला गेला.

आणि त्यामुळे सिद्धोपंत खूपच सुखावले.

त्यांची कन्या उजवली गेली.

ती त्या दिवसापासून सौ. रुक्मिणी म्हणून ओळखली जाऊ लागली. विठ्ठल–रुक्मिणी जणू विष्णु–लक्ष्मी बनले.

तीर्थयात्रा अपूर्ण होती. ती एकाकी चालली होती, एकाकी घडत होती आता तिला विशिष्ठ स्वरूप आलं.

रामेश्वरपर्यंत यात्रा करून विठ्ठलपन्त आळंदीस परतले. पण मनी एक शल्य खुपत होते.

तीर्थयात्रेला बाहेर पडलेला हा तरुण संसारात बद्ध झाला तो आईवडिलांच्या अनुपस्थितीत.

हे शल्य उरी होते म्हणून विठ्ठलपंत आपल्या परिणीत वधूसह आपेगावी परतले.

आपला सुपुत्र वधूसह परतलेला पाहून गोविंदरावाना अत्यंत आनंद झाला. मुलगा आता मार्गी लागला या समाधानात विठ्ठलपंतांच्या मायपित्यानी इहलोकीची यात्रा आटोपली.

गोविंदराव-नीराबाईनी आपली जीवितयात्रा संपल्याचा परिणाम म्हणून विठ्ठलपंताची आपेगावची ओढ कमी झाली.

मातापित्यांच्या प्रेमळ छत्राखाली असता ते पुष्कळ वेळा पैठणास आपल्या मातुलगृही जात असत. तिथे रहात असत. पण एक पाश तुटल्यामुळे त्यांचे मन तिथे रमेना. त्यांची भ्रमंती आपेगांव, पैठण, आळंदी अशी असे. आता आपेगावची ओढ संपली होती त्यामुळे ते पुन: आळंदीस परतले.

आळंदीस आले की विठ्ठलपंत माझ्या सन्निध येऊन बसत. सिद्धेश्वराचे दर्शन घेतले की वैराग्य वर उसळून येई पण पुन: रुक्मिणीदेवीचे दर्शन घडले की 'नातिचरामि' शपथ आठवे.

अशा दोलायमान अवस्थेत दिवस सरत होते.

या सरणाऱ्या दिवसाबरोबर विठ्ठलपंताचा मोहसुद्धा सरत होता. अन् ते दिवसे दिवस उदास बनत चालले असल्याचा मला भास होत होता. अन् घडलेही तसेच !

शेवटी तो दिवस उजाडलाच.

काहीतरी कामात असताना विठ्ठलपंतानी रुक्मिणीदेवीना विचारले अन् त्या व्यग्रअवस्थेत रुक्मिणीदेवीनी 'जा, जा' असे म्हणताच विठ्ठलपंत स्नानाचे निमित्त करून इंद्रायणीवर आले. स्नान केले. सिद्धेश्वराचे दर्शन घेऊन जे बाहेर पडले ते पडलेच. विठ्ठलपंत घरी परतले नाहीत हे पाहून साऱ्यांना चिंता वाटू लागली.

त्या चिंतेतून शोधाशोध सुरू झाली.

रुक्मिणी चार दिवस जेवली नाही.

सिद्धोपंतानी शोध घेतला.

वृत्त यायचे, लोक म्हणायचे 'परवा आम्ही पाहिले ! काल उत्तरेकडे प्रस्थान ठेवल्याचे आढळले.'

उत्तर !

हिमालयाचे आकर्षण ! !

आता रुक्मिणीने निश्चय केला !

तिनं आपली दिनचर्या ठरवून टाकली. अन् ती त्याप्रमाणे इथं नियमाने येऊ लागली.

माझ्या लक्षलक्ष प्रदक्षिणा झाल्या.

तिचा खंड चुकला नाही. ऊन असो, पाऊस असो वा शीत असो, ती सिद्धेश्वराचं दर्शन घेऊन यायची, मला प्रदक्षिणा घालत राहायची..

प्रारंभीप्रारंभी मला नवल वाटलं.

हळू हळू ते ओसरले, त्याची जागा आनंदाने घेतली. रुक्मिणी प्रदक्षिणा घालतेय या आनंदाने माझ्या मनी दंभ भरला आपण किती मोठे याचा ताठा काही दिवस मिरवला.

पण तो क्षणभर टिकला.

कारण एके दिवशी ध्यानी आलं–

रोजच्या या प्रदक्षिणा प्रारंभी मोठेपणाच्या वाटल्या तरी त्या माझ्या कर्तृत्वाला जखडणाऱ्या ठरतील असं वाटूं लागलं अन् पुरा हबकून गेलो.

याचं कारण असं, या प्रदक्षिणा माझ्या मोठेपणाची परीक्षा घेण्याचं एक साधं साधन होतं. मला ते एक आव्हान होतं. रुक्मिणीनं आपल्या सौभाग्याचा कौल लावला होता.

प्रारंभी हे मला कळलं नव्हतं. अन ज्या दिवशी हे कळलं तेव्हा त्यातील धोका समजून आला अन पुरा हबकून गेलो. पण माझं दैव बलवत्तर असलं पाहिजे.

कारण–

या शिव-क्षेत्रांत काशीहून एक सत्पुरुष आल्याचं मला दिसलं. त्या दिवशी रुक्मिणी नेहमीप्रमाणे आली. तिनं सिध्देश्वराला वंदन करून नेहमीची आन्हिकं आटोपली आणि या तीर्थात आलेल्या त्या सत्पुरुषाला तिनं नम्रतेने वंदन केल्याचे मी पाहिले अन् ती उठत असताच एकदम चपापल्याचे मला दिसले.

दुसऱ्या दिवशी रुक्मिणी आपले पिता सिध्दोपन्त यांच्यासह त्या सत्पुरुषाबरोबर उत्तरेकडे निघाल्याचे मी अवलोकिले.

काशीहून आलेल्या त्या श्रीपाद महाराजाना कळून चुकले की ज्याला आपण चैतन्य म्हणून संबोधतो तो दुसरा तिसरा कोणी नसून रुक्मिणीपती विठ्ठल आहे.

अल्पावधीत रुक्मिणी पुनः परतली.

अन् माझ्याभोवती तिच्या प्रदक्षिणा सुरूं झाल्या.

पूर्वीच्या प्रदक्षिणेत आणि नंतरच्यात खूप फरक होता.

नंतरच्या प्रदक्षिणेत ' चैतन्य ' आलं होते.
पूर्वीची रुक्मिणी आणि उत्तरेकडून परतलेली रुक्मिणी यात पुष्कळ अंतर होते,
आताची रुक्मिणी रसरशीत भासू लागली होती.
तिला ईप्सित मिळाले होते.
पण हे ईप्सित तिला सुखापासून दूर नेत होते.
गांवातली तथाकथित श्रेष्ठ मंडळी या विठ्ठल-रुक्मिणीची हेटाळणी करीत. ते म्हणत

> **विपरीताचे सुटले वारे**
> **संन्याशाला झाली पोरे**
> **धर्म सारा संपून गेला**
> **आता कोणीं नाहीं उरला**

सोन्यासारख्या मुलांना लोकनिंदेचा त्रास होत असल्याचे जाणताच ही सारी मंडळी तीर्थयात्रेस निघाली.
मला खूप खूप वाईट वाटलं.
रोजचा वेळ कंटाळवाणा भासू लागला.
एके दिवशी पश्चिमवातानं वृत्त आणलं.
ब्रह्मगिरीची परिक्रमा करताना निवृत्तीच्या मागे वाघ लागला. अन् मी तळापासून शहारलो.
मायपित्यापासून ताटातूट झालेल्या निवृत्तीविषयी करुणा वाटली.
पण मी स्थावर !
सळसळलो अन् गप्प बसलो. दुसरं काय करणार ? सातव्या आठव्या दिवशी पश्चिमवातच नाचत, दौडत आला. अन् गुजगोष्ट सांगून गेला.
निवृत्ती सापडला होता !
पण कुणाला ?

अष्टसात्विकभावाने रसरसलेला निवृत्ती परत आला. तो सापडला त्याच्या गुरूला-गहिनीनाथाला. गहिनीनाथानी त्याचा अधिकार पाहून त्याला 'अधिकारी गुरु' करून मायपित्याकडे पाठवून दिलं होतं. निवृत्ती परतला तो 'नाथ' होऊन.

ब्रह्मगिरीची परिक्रमा अशा रीतीने फळाला आली होती. पण समाजाचा रोष कमी झाला नव्हता.

विठ्ठलपंत आणि रुक्मिणी खंतावले. कुठेतरी स्थिरस्थावर होतेय असे वाटायच्या आत सारी भावंडे चक्रवातात सापडली. समाजाने दिलेली देहत्यागाची सूचना विठ्ठल-रुक्मिणीनी प्रत्यक्षात आणली. आपली मुले सुखी व्हावीत या इच्छेने त्यांनी देहत्याग केला खरा पण कांही दिवसापूर्वी 'नाथ' झालेला निवृत्ती 'अनाथ' झाला होता. आदल्या रात्री फिरलेला मायेचा हात आता कायमचा दुरावला होता.

मायपित्यांची प्रेमळ मूर्ती दिसणार नाही, त्यांचा स्नेहाळ हात पाठीवरून फिरणार नाही याची जाण या साऱ्यांना एका रात्रीत झाली. एका रात्रीत ही भावंडे मोठी झाली. त्यांचा दिनक्रम ठरला. मी मात्र खंतावलो.

ज्या मातेमुळे मी 'मी' झालो ती आता दिसणार नव्हती याचे शल्य उरी राहिलं ते कायमचे ! ही भावंडे समाजाचे शिव्याशाप झेलत इतराना दूषणे न देता अधिकाराने मोठी होत होती. ज्ञानेश माझ्याशी हितगुज करीत नसे, पण त्याची सिद्धेश्वराशी गट्टी असावी असे वाटे.

त्याचे मोठेपण इतराना फार उशीरा कळले.

पंचक्रोशीत लोक या भावंडाविषयी अद्याप चांगले बोलत नसत. दूषणे देणारेच अधिक होते. केव्हा केव्हा मुक्ता खंतावयाची. त्यावर ज्ञानेश म्हणे, 'अग हे असं चालायचंच, तप आचरायला नको का?'

तो पुढे म्हणे –

तरी तप जे का सम्यक् । तेही त्रिविध आइक ।
शारीर, मानसिक । शाब्दीक गा ।।

त्यातलं हे मानसिक तप आहे.
मुक्ताई म्हणायची हे असं कसं ?
तेव्हा ज्ञानेश्वर मनाशी म्हणे –

स्वामिचिया योगे । झालो स्वरूपाकार ।
उतरलो पार । मायानदी ।।

ज्ञानेशाला माहित होते

पूर्वजन्मी सुकृते फार केली ।
ती मज आजि फळासी आलीं ।।

कारण निवृत्तीनाथानी त्यांना मायपित्यांच्या निधनानंतर गुरूपदेश देऊन मोठं केलं होतं. निवृत्तीनाथानी ज्ञानेशाना केव्हा गुरूपदेश दिला होता याचं गुह्य मलाच उमगलं नव्हतं. मग इतरांचं काय ?

इतरांना ही भावंडे मोठी होत आहेत याचं भान येणं शक्यच नव्हते. म्हणून या चारी भावंडांना पैठणला जाऊन शुद्धीपत्र आणण्यास सांगण्यात आले. त्या समाजपुरुषाला काय माहीत की–

श्री गुरुसारखा । असता पाठीराखा ।
इतरांचा लेखा । कोण करी ?
राजयाची कांता । काय भीक मागे ।
मनाचिये जोगें । सिद्ध पावे ।।

अशी ज्ञानेश्वरांची अवस्था झाली आहे.

या समाजपुरुषाला भूर्जपत्रावरील शुद्धीपत्र हवय एवढंच उमगत होतं.

समाजानं असे आज्ञापिले म्हणून ही चारी भावंडे आपल्या स्वानंदात मग्न होऊन विठ्ठलपंताच्या मामाच्या घरी जाण्यास पैठणला निघाली. मी पुनः शहारलो.

उन्हाला ऊन न म्हणता, थंडीला बोचरी असे दूषण न देता ही भावंडे पैठणकडे वाटचाल करीत होती. ज्ञानेशाला माहीत होते.

> नित्य सत्य मित । हरिपाठ ज्यासी ।
> कळीकाळ त्यासी । नातळती ।।

त्यामुळे तापलेल्या भूमीचे त्यांना भान नसायचे. ज्ञानेश वाटेत म्हणत असायचा–

> बरवा हो हरि बरवा हो ।
> गोविंद गोपाळ गुण गरवा हो ।।
> पाहता वो हरी पाहता वो ।
> ध्यान लागले या चित्ता हो ।।

एकदा असे ध्यान लागल्यावर कुठले शीत, कुठले ऊन ? पण मला आपले उगीचच वाटायचे, म्हणून मी येथूनच वेड्यासारखा त्यांच्यावर सावली धरायचा.

हीं सारी भावंडे पैठणला पोहोचल्यावर तिथं प्रश्न उपस्थित झाला यांना काय संबोधायचे याचा !

ज्ञानेश म्हणाला,

> जीव तोच शिव । होऊनिया ठेला ।
> शब्द तो मुराला । निःशब्दा माजी ।।
> आता 'मी' 'तू' कैचा । सर्व एकाकार ।
> जाहला ज्ञानेश्वर । स्वयं ब्रह्म ।।

पैठणच्या विद्वानांच्या सभेमध्ये शुद्धीपत्र आणण्यासाठी गेलेल्या सभेत ज्ञानेश असं म्हणताच एकजण खेकसला अन् म्हणाला, "ही

चर्पटपंजरी बंद कर.' तो संतापून पुढे म्हणाला, 'तू स्वतःला ब्रह्म मानतोस काय ? तर मग सर्वांनाच ज्ञान देतोस हे ओघानेच आले. आम्हाला यातुविद्या दाखवून भ्रमिष्ठ करतोस काय ?'

चिदानंद रूप । चेतविले एक
एकपणें गुण गुणीं । दावी अनेक
आदी अंती गुण । सर्वत्र निर्गुण
गुणासी अगुण । भासती ना ।।

असं आहे म्हणतोस तर चिदानंद कोठे आहे दाखव. एवढ्यात समोरून एक महिष पुढे येत होता. त्याकडे अंगुलीनिर्देश करून त्या पंडितानं म्हटलं–

'चिदानंदाचे चेतवलेले रूप ते हेच का ?'

ज्ञानेश म्हणाला, 'होय'

'दर्शव' म्हणताच ज्ञानेशाने त्या महिषाच्या मस्तकी हात ठेवला. शक्तिपातयोग सामर्थ्याने आपले सारे तेज त्या महिषाकडे संक्रमित केले. अन् काय आश्चर्य. तो महिष मानुषवाणीने वदू लागला–

'अग्निमीळे पुरोहितं ....'

एकदम आक्रित घडलं.

जो तो म्हणू लागला.

काय सांगू देवा । ज्ञानोबाची ख्याती
वेद महिषा मुखी । बोलवीले ।।

पूर्वानिलानं हे सांगताच मी मोहरलो.

या वृत्तामुळं ज्ञानेशाला केव्हा भेटेन असं मला झालं. पैठणमधील लोकांनी ज्ञानेशापुढे लोटांगण घातलं. !

ज्याला त्याला वाटायचे ज्ञानेशाने आपल्या घरी पायधूळ झाडावी. देवकुळे–मामींना तर या नातवंडांना कुठे ठेऊं कुठे नको असे व्हायचे.

पण ही चारी भावंडे आपल्यात काही विशेष आहे असं मानीत नसत. पूर्वानिल हे सांगत आला होता. ही भावंडे पैठणच्या गोदावरी तीरा-वरून अनादि पंचक्रोशी श्री महालया असणाऱ्या नेवासे क्षेत्री आली. ज्ञानेशाची प्रतिमा इथे फुलारली. अन् –

मोगरा फुलला मोगरा फुलला।
फुलें वेचिता अतिभारू कळियासी आला॥

असं झालं. या सुगंधाने भावार्थ दीपिका प्रसन्नपणे गंधित झाली. 'भावार्थदीपिका' ग्रंथ पूर्ण झाला. नेवासे परिसरातील समाजाला वाटले ज्ञानेशाची हत्तीवरून मिरवणूक काढावी, त्याचा सन्मान करावा.

ज्ञानेशाने नम्रपणे नकार दिला आणि तो आळंदीस परतला. माझा आनंद गगनात मावेनासा झाला. ज्ञानेश प्रसन्नचित्ताने सिद्धेश्वराच्या दर्शनास येई, माझ्या पाराशी क्षणभर थांबत अन् मग मला आपले उगीचच शहारल्यासारखे होई.

एकदा ही भावंडे ऊन खात एका भिंतीवर बसली असता वटेश्वर चांगदेव येत असल्याचे वृत्त आलं. हठयोगी चांगदेव म्हणजे पुराणपुरुष ! चौदाशे वर्षे आयुष्य उपभोगलेल्या योग्यानी वाघावर स्वार होऊन ज्ञानेशाकडे यावे यातच आश्चर्य होतं.

मी हे सारे ऐकत होतो, अनुभवत होतो.

चांगदेवांचा शिष्य ज्ञानेशाला देण्यासाठी पत्र घेऊन आला होता, पत्र कोरं होतं.

चांगदेवाना प्रश्न पडला होता. पत्राचा मायना काय लिहावा याचा ! ज्ञानेश वयाने लहान म्हणून 'अनेक आशीर्वाद' लिहावा तर तो आपल्यापेक्षा योग सामर्थ्यात ज्येष्ठ ! 'साष्टांग नमस्कार' म्हणावे तर अद्याप विशी ओलांडली नव्हती अन् कितीतरी शतके लहान !

कोरं पत्र पाहताच ज्ञानेश काय उमजायचे ते उमगला.
ज्या भिंतीवर तो बसला होते, तिलाच म्हणाला चल.
एक निर्जीव वस्तू सजीवाप्रमाणे आज्ञापालन करीत होती,
मी मनात हरखलो होतो.
चांगदेव सजीवावर, क्रूर श्वापदावर विजय मिळवण्यांत निष्णात असले तरी ते फिकेच होते. इथे तर त्यापुढची पायरी होती !
निर्जीवाना संजीवनी देण्याचे सामर्थ्य यातून दिसत होते.
चांगदेव या प्रकाराने नम्र झाले. त्यांचा अहंकार संपताच ज्ञानेश म्हणाला.

नाही ते चित्र दाविती । परी असे केवळ भिंती
प्रकाशे ते संवित्ती । जगदाभरे ॥

झाले. चांगदेवसुद्धा मनीं सुखावले.
या प्रसंगाने पुनः एकदा आक्रीत घडलं होतं.
पण ही सारी आक्रीतं संपायची होती.
ज्ञानेशाने तीर्थयात्रा आरंभिली.
या तीर्थयात्रेत कोण कोण होतं ?
नामदेव शिंपी होते, नरहर सोनार होते, गोरोबाकाका कुंभार होते.
चोखोबा महार होते, सेना न्हावी होते.
आपपर भाव नव्हताच तिथे –
ज्ञानेश म्हणे –

पाहे पां बुडबुडा नेऊता जाये ।
तेउते जळचि एक तया आहे ।।
मग विरे अथवा राहे ।
तऱ्ही जळाचिमाजी ॥

तो म्हणे ज्याला आपण दोन म्हणतो, ते खरोखर दोन असतच नाहीत.

कारण

ज्ञानदेवा गोडी संगती सज्जनी
हरी दिसे जनी वनी आत्मतत्वी

असा त्याचा भाव होता. असा अद्वैतभाव अंगी मुरल्याने त्याला आता निराळ्या विचारांनी वेढून टाकायला प्रारंभ केला असला पाहिजे.

तीर्थयात्रा संपवून ज्ञानेश परत आला अन् मला दिसले की सिद्धेश्वर अलीकडे आनंदी दिसतोय. मी त्याला कारण विचारताच म्हणत होता ' लौकरच कळेल. '

एके दिवशी मला दिसले.

अल्याड पल्याड पताकांचे भार
मध्ये मनोहर इंद्रायणी
ज्ञानेश्वरापाशी आनंदी आनंद
नाचतो गोविंद कीर्तनाशी

असं कां घडतंय हे मला समजेना.
सिद्धेश्वर म्हणत होता –

दशमीचे दिवशी केली प्रदक्षिणा
आणिक दर्शना संत उभे
रात्रंदिवस त्यांही केला हरि जागर
हरी दिनी थोर कृष्ण पक्षी
मग केले स्नान भागीरथीचे तीरी
संत महंता भारी पूजीयेलें

आणि आपल्या शेजारी ज्ञानेश संजीवन समाधी घेणार आहे. सिद्धेश्वरासमोर ज्ञानेश संजीवन समाधी घेणार आहेत म्हणून असं घडत होतं तर !

माझ्या हृदयात कालवाकालव सुरू झाली.

मी आता सावचित्त होऊन पहात होतो.

माझ्या पाराशेजारी पंक्ती बसल्या. तेवढेच समाधान वाटले. स्वत: श्रीपती विष्णू पांडुरंग रुपाने वाढत होते. संत मंडळी जेवत होती. आचवत होती,

आणि मी मात्र कासावीस होत होतो.

स्वत: राही रुक्माबाईनी आवडीने ज्ञानेशाला वाढून त्याचे पारणे सोडले.

सगळी संत मंडळी सिद्धेश्वराजवळ आलेली दिसली.

तिथं गुजगोष्टी सुरू झाल्या,

सारी पंचक्रोशी आक्रोशत होती.

ज्ञानेश मात्र सुखावला होता,

आणि दुसरा दिवस उजाडला.

कार्तिक कृष्ण त्रयोदशी !

मी पहात होतो.

> मागे पुढे संत पताकांचे भार
> मध्ये ज्ञानेश्वर मिरविती
> जयजयकारध्वनि करिती सुरगण
> वर्षती सुमन स्वर्गाहुनी
> पताकांची छाया दुणावली फार
> सिद्ध ज्ञानेश्वर तेव्हां झाले

मला वाटले—

> मुंगीचिये विवरी लागलीसे आग
> पुढे आणि मागे जाले नाही

सळसळ थांबवून डोळी प्राण आणून मी पाहतोय. नामदेवानी नारा, विठा, गोंदा महादा याना पाठवून समाधीची जागा झाडविली. दुपार कसली, सूर्य अस्ताला न जाताच सूर्यास्त व्हायची वेळ आली. ज्ञानेश संजीवनी समाधी घेण्यास निघताहेत या एका विचारानेच सारेजण गलबललेले होते. तेवढ्यात

देव निवृत्तीयानी धरिले दोन्ही कर ।
जातो ज्ञानेश्वर समाधीसी ॥

असं दृश्य दिसलं–

ते दृश्य कसले ? असं वाटलं–

नदीचिया माशा घातले माजवण ।
तैसें जनवन कालवले ॥

अशी स्थिती झाली.

इकडे ज्ञानेश मात्र शांत होता.

ज्ञानेशाने दोन्ही कर जोडून आपल्या वडील बंधूना म्हटले,

पाळिले पोशिले चालविला लळा ।
माझ्या बा कृपाळा निवृत्ती राजा ॥

ज्ञानेश आता कुणाचा राहिला नव्हता.

व्याकुळ न होताच तो मनी म्हणत होता–

घनु वाजे घुणघुणा ।
वारे वाहे झुणझुणा ॥
भावतारकु कान्हा ।
वेगी भेटवा का ना ॥

खरोखरीच तो भवतारकु कान्हयाच्या भेटीस जात होता का ?

मला हे सारे अतर्क्य वाटत होते.

त्याला खरंच त्याची आवश्यकता नसावी. त्यानेच नव्हतं का चांगदेव महाराजाना म्हटलं होतं ?

सोनिया वरकल सोने जैसा ।
का मुख मुखा हो आरसा ॥
तुज मज संवाद तैसा
चक्रपाणी ॥

असे असताना ते तसे का म्हणत असावेत याचं कोडं मला पडलं होतं. कारण त्याना माहीत होते–

म्हणोनी माझ्या स्वरूपी । मन बुद्धी इथे निक्षेपी ।।
चेतुलेंनी सर्वव्यापीं । मीचि होसी ।।

त्याना जे जे करावेसे वाटत होते त्या मागे एकच हेतू होता. त्याना इतराना मार्गदर्शन करायचे होते. समाजाला कार्यप्रवण करायचे होते. मी पहातच होतो.

ज्ञानेश्वर समाधीस्थानाकडे जात होते आणि नामदेव म्हणत होते.

समाधी परिपूर्ण बैसले ज्ञानेश्वर
उठविले भार वैष्णवांचे
तीन वेळा जेव्हा जोडिले करकमळा
झाकियेले डोळे ज्ञानदेवे
भीमसुद्रा डोळा निरंजनी लीन
जाले ब्रह्मपूर्ण ज्ञानदेव
नामा म्हणे लोपला दिनकर
बाप ज्ञानेश्वर समाधिस्त ।

ज्ञानेश्वरानी संजीवनी समाधी घेतली. निवृत्तीनाथानी ज्या हातानीं आपला शिष्य घडवला त्याच हातांनी त्या समाधीस्थानावर शिला बसवून त्या अलौकिक शिष्याचे जीवन समाप्तीचे कार्य केले.

समाधीस्थानावर शिळा बसवताच एकच गलबला झाला. सारा आसमंत हेलावला.

ज्ञानेश्वरांच्या समाधीला अवघ्यानी नमस्कार केला. इंद्रायणीत जाऊन आचमन केले आणि ते सारे घरोघरी परतले.

मी मात्र इथेच उभा होतो.

कृतज्ञता म्हणून दोन पाने गाळली.

किती दिवस झाले उमगत नाही.

पण प्रसंग अजून डोळ्यापुढे उभा राहतो.

अगदी जशाचा तसा.

मला धन्य वाटते ते एका कारणासाठी.

या प्रसंगाला मी साक्षी होतो म्हणून.

मला ' मी ' पण आले ते त्या विभूतीमुळे म्हणून !

~~म्हणून ही !~~

'मी' कोण ?

सोन्याचा पिंपळ ?

नव्हे. मी तसा साधा पिंपळ,

एक साक्षी !

आद्य राष्ट्रसेवक

नामदेव–

कार्तिक शुद्ध एकादशीला 'प्रबोधनी एकादशी' म्हणतात चातुर्मासाची समाप्ती दर्शविणारी म्हणून त्या एकादशीकडे पहात असले तरी त्या मागे एक सूत्र आहे. जागृतावस्था आल्याचे प्रतीक म्हणून तिच्याकडे पाहतात.

जागृत होणे याचाच अर्थ पुढच्या सर्व क्रिया करण्याची सिद्धता असणे असा होतो. आपल्या मंत्रद्रष्ट्या ऋषींनी म्हटले आहे.

कलिः शयानो भवति संजिहानस्तु द्वापरः ।
उत्तिष्ठस्त्रेता भवति कृतः संपद्यते चरन् ॥
चरैवेति, चरैवेति, चरैवेति.

निद्रित असणारा कलियुगाप्रमाणे, जो जागा झाला आहे, तो द्वापार युगाप्रमाणे, जो उठून बसला आहे तो त्रेतायुगाप्रमाणे तर चालत राहणारा कृत म्हणजे सत्ययुगाप्रमाणे असतो. (म्हणून) गतिमानच रहा, गतिमानच रहा, गतिमानच रहा.

हे सृष्टीचे चक्र सतत फिरत रहायचे असेल तर ते फिरवणारा कोणी तरी हवाच. विधाता हे काम करीत असतोच मात्र त्याला हे काम करण्यासाठी कोणतेतरी साधन हवे असते. ते साधन असते आपण. या साठी आपल्या जन्ममृत्यूचा खेळ चालू असतो. यामध्ये मानवाच्या जीवनातील कर्माचा हातभार लागलेला असतो. मनुष्याच्या जीवनामध्ये निर्माण झालेल्या मोहामुळे त्याला हे जीवनमृत्यूचे खेळ खेळावे लागतात.

माउली म्हणतात.

पै व्यामोहाचियें । शेजे बलिया अविद्या निद्रितु होइजे ।
ते वेंळी दुस्वप्न हा भोगिजे । जन्ममृत्यूचा ॥

अविवेकरूपी अंथरुणावर प्रबळ अविद्येच्या योगाने ज्या वेळेला जीव निजतो तेव्हा तो जन्ममरणरूपी वाईट स्पप्न अनुभवितो

परमेश्वराचे साधन म्हणून आणि आपल्या मोहाने निर्माण झालेले कारण म्हणून आपण जन्म घेतो.

असा जन्म कोणत्या दिवशी मिळेल हे पुन: आपल्या पूर्व सुकृतावर अवलंबून असणारच.

आणि म्हणून 'प्रबोधिनी एकादशी' दिवशी जन्म मिळणे भाग्याचे होय. कारण जीवनातील खऱ्या जागृतीची जाणीव करून देणारा हा दिवस !

याच प्रबोधिनी एकादशीला रविवारी प्रभव नाम संवत्सर असताना शके ११९२ ला एका प्रबोधनकर्त्या व्यक्तीचा जन्म झाला. अन् तोही पंढरपुरात !

आद्य शंकराचार्य 'पंढरपुर' संदर्भात म्हणतात

महायोग पीठें तटे भीमरथ्यां
वर पुंडरीकाय दातुं मुनींद्रैः ।
समागत्य तिष्टन्तमानन्द कंदं
परब्रह्मलिंग भजें पांडुरंगम् ॥

भीमा नदीच्या तटावर महान योगाचे पीठ असणाऱ्या स्थली अगणित मुनींद्राकडून पुंडलीकाला वर देण्यासाठी येऊन उभे राहणाऱ्या परब्रह्मलिंग आणि आनंदाचा कंद असणाऱ्या पांडुरंगाची मी पूजा करतो.

पंढरपुर हे अशा रीतीने महान योगाचे पीठ आहे असा त्याचा स्पष्ट अर्थ आहे. या योगपीठामध्ये जन्म मिळणे दुर्लभ.

पण याच दुर्लभ योगपीठात राहण्यास येऊन दामाजीशेठ रेळेकर कृतकृत्य झाले

याचं कारण असे की, त्यांच्या घराण्यात कुलपरंपरागत विठ्ठलभक्ती होती. आणि नियमित पंढरीची वारी होती. काही कारणामुळे नरसी बामणीस राहून पंढरीस येणे दामाजीशेठना जमणे अवघड वाटू लागले. त्यामुळे दामाजीशेठ नरसी-बामणी गाव सोडून पंढरपुरास येऊन स्थायिक झाले.

पंढरीरायाचे दर्शन नित्य घडू लागले.

दामाशेठाना नेहमी वाटायचे.

शिंपियाच्या कुळी । जन्म मज जाला ।
परि हेतु गुंतला । सदाशिवी ॥

या वाटण्यामुळेच ते नरसी बामणीहून पंढरपुरास आले. पंढरीसच का यावे असे कोणी पुसले तर ते म्हणत–

अवघी हीं पंढरी । सुखाचीं ओवरीं ।
अवघ्या घरी । ब्रह्मानंद ॥
अवघा हा विठ्ठल । सुखाचाच आहे ।
अनुसरे तो लाहे । सर्व सुख ॥

आणि सर्व सुख लाभावे असेच जणू घडायचे होते. दामाशेठांचे शिवण्या टिपण्याच्या व्यवसायाबरोबर विठ्ठलासी नाते जोडणे चालूच होते. पिढया नी पिढया हे असे चालूच रहावयाचे होते. दामाशेठांच्या भक्तीचा वारसा पुढे चालावा असे नियतीला वाटत असले पाहिजे.

दामाशेठ पंढरपुरास येऊन स्थायिक झाल्याने त्यांच्या मनाची तगमग शांत झाली. आणि ते आता अभिमानाने म्हणू लागले–

माझ्या बापाची । मिराशी गा देवा ।
तुझी चरणसेवा । पांडुरंगा ॥

पंढरीरायाची अशी मनोभावे सेवा केल्याची फलश्रुती दामाजीशेठ आणि गोणाई या दांपत्याला मिळणारच. त्यांना देवभक्त पुत्र झाला.

शुद्ध देखोनिया भाव । पोटी आले नामदेव ॥

असे जे घडले त्याचे कारण

सर्वभावे तूंते । जे ध्याती दातारा ।
त्याची या संसारा । तूंचि होसी ॥
ज्याचे चित्ती नाही । आणिक काही काम ।
त्याचा योग क्षेम । तूच होसो ॥

असे आहे.

दामाशेठना योगक्षेमाची चिंता नव्हती. त्यांना सर्वभावे भजणारा पुत्र हवा होता. नामदेव रूपाने तो मिळाला. दामाशेठ संतुष्ट मनाने भजनकीर्तनात दंग असायचे. लहान नामदेवावर तसे संस्कार घडत गेले. घरी आधीच वारकरी पंथाचे वळण आणि त्यात भर संस्काराची ! परिणामत: नामदेवांचे संस्कारक्षम मन घडत गेले. त्यामुळे

वाचा पिकली पिकली । हरिनामाची बरो आली ॥

असं घडू लागलं. यातून

केशवाचे प्रेम । नामयाच जाणे ।
नाम्या हृदयी असणे । केशवाचे ॥
नामा तो केशव । केशव तो नामा ।
अभिन्नत्व आम्हा । केशवासी ॥

असे होऊ लागले. अद्वैत असे मुरत चालले. त्यातून एके दिवशी दामाशेठनी पंढरीनाथास नैवेद्य घेऊन जाण्याचे काम नामदेवाकडे

सोपवले. नामदेवानी बालसुलभ स्वच्छ मनाने नैवेद्य दाखवला आणि पांडुरंगाने तो भक्षण करावा अशी अपेक्षा ठेवली.

पुष्कळ कालावधी गेला तरी पांडुरंग नैवेद्य भक्षण करीत नाही हे पाहून नामदेव म्हणाले -

केशवा माधवा । गोविंदा गोपाळा ।
जेवी तू कृपाळा । पांडुरंगा ॥ १ ॥
अच्युता वामना । दशरथ नंदना ।
जेवी तू गा कृष्णा । पांडुरंगा ॥ २ ॥
कृष्णा विष्णू हरी । मधुसूदन मुरारी ।
जेवी तू नरहरी । पांडुरंगा ॥ ३ ॥

धांवा करून नामदेव थकले. त्याना ग्लानी आली पुढचे काहीच दिसेनासे झाले. आणि याच वेळी

ऐसी ग्लानी करिता विठ्ठल पावला ।
नैवेद्य जेविला । नामयाचा ॥

असं घडलं आणि

जेऊनिया हाती । तेणे दिधली वाटी ।
आला उठाउठी । नामा घरा ॥

नामदेवानी नैवेद्य परत न आणता तो पांडुरंगाने भक्षण केल्याचे सांगताच सर्वांना आश्चर्य वाटले. तसाच संशयही आला दुसऱ्या दिवशी तसाच प्रकार घडल्याचे पाहाताच दामाशेठ, आणि गोणाई कृतार्थ झाले आणि म्हणू लागले.

धन्य माझे भाग्य । धन्य माझा वंश ।
परब्रह्म वेष । प्रगटले ॥

असे म्हणण्याचे कारण दामा-गोणाईनी नामदेव विठ्ठलभक्तीने धुंद होऊन वाळवंटी कीर्तन करीत असल्याचे पाहिले होते.

सुंभाचा करकोटा रकट्याची लंगोटी
नामा वाळवंटी कीर्तन करी

असे दृश्य त्यांच्या परिचयाचे होते. काही वेळेला तर नामदेव कीर्तन करी पुढे नाचे पांडुरंग असा भास पुष्कळांना होई. त्यामुळे नामदेवावर अविश्वास दाखवणे अयोग्य होते. काही काही वेळेला ते एवढे हरीरूप होत की, 'उठी उठी रे नाम्या, चाल रे सांगाती' असं सांगण्याची पाळी येई. एकदा तर एका कुत्र्याने नामदेवांच्या घरातून एक भाकरी पळवली आणि ते धावू लागले. नामदेवानी हे पाहिले मात्र आणि हाती तुपाची बुधली घेऊन त्या कुत्र्याच्या मागे धांवत सुटले. लोकांनी थांबवून विचारणा करताच नामदेव उत्तरले. पंढरीनाथ कोणाच्या रुपाने येईल हे कसे सांगू ? त्याने तुपाशिवाय भाकरी खाणे योग्य आहे का ? मला ते आवडत नाही. म्हणून मी तुपाची बुधली घेऊन धावतोय. आता त्यावर लोक काय बोलणार. नामदेव असे फुलत होते. पण या फुलण्याच्या जोडीला नकळत कुठेतरी दंभ प्रवेश करत होता.

आपण परमेश्वराचे लाडके आहोत या विचाराने ते गर्विष्ठ झाले. आणि निवृत्तीनाथ, ज्ञानेश्वर ही भावंडे पंढरीनाथाच्या दर्शनास आली असता नामदेवाना वाटले.

नित्य समागम हरीच्या चरणी
हे आणि आम्हीं देवभक्त

असे असताना

नामा म्हणें कायें वंदू यांचे चरण
अंग परब्रह्म मजपाशी

अशी अहंता आली.

अभिमानामुळे नामदेव त्यांच्या दर्शनास गेले नाहीत. नामदेव श्रेष्ठ भक्त आहेत याची जाण या उभयता बंधूंना होती. ते मनी म्हणाले—

जालासी हरिभक्त । तरी आम्हा काय ? ।
आतली ती सोय । न ठाऊको ।।
ऐक रे नामया । होई आत्मनिष्ठ ।
तरीच तू श्रेष्ठ । ज्ञानी म्हणे ।।

ज्याला संतांचा सन्मान करणे जमत नाही त्याने देवापाशीं राहून काय केले ?

मुक्ताबाई तर म्हणायची –

> कर्पुराशी झाला । दीपाचा शेजार ।
> काय गुणे सार । राहिल त्याचा ? ॥

कारण कापूर शुद्ध असून त्याचा काय उपयोग ? दीपाशी त्याचा संपर्क आला की कापूर संपतो. त्याप्रमाणे नामदेव शुद्ध भक्त आहेत पण त्याचा उपयोग नाही कारण

> म्हणे मुक्ताबाई । चंदनाचे झाड ।
> अहंतासर्वे वेढे । गुंडाळीले ॥

असं झालं होतं

निवृत्तीनाथानी यावर नामदेवाना समजावले आणि म्हटले –

> आपुले स्वहित । करावे आपण ।
> संतांच्या सन्माना । चुको नये ॥

नामदेव काय उमगायचे ते उमगले. तशात प्रत्यक्ष पंढरीनाथानी सांगितले.

> गुरू वाचूनिया । कैचा मुक्तीठाव ।
> संसार हा वाव । कैसा होय ? ॥
> नाम्या तुवा । गुरुसी जावे शरण ।
> ते जे भवबंधने । मुक्त होसी ॥

प्रत्यक्ष पंढरीनाथानी असं सांगताच नामदेवाना मूर्च्छा आली. नामदेव भूमीवर कंठ सद्‌गदित होऊन लोळू लागले· डोळयातून अश्रू लोटू लागले. गुरूला शरण जाणे आवश्यक आहे अशी जाणीव होताच पंढरीनाथाच्या सांगण्याप्रमाणे ते ' आवंढया नागनाथ, यथे विसोबा खेचर यांच्या भेटीस जाण्यास निघाले.

आवंढया नागनाथास जाऊन त्यांनी विसोबा खेचराविषयी चौकशी केली. लोकांनी प्रारंभी नामदेवांची टर उडवली आणि

विसोबाविषयी अनुद्‌गार काढले. एवढ्या लांबून चालत आल्याचे आणि लोक विसोबाविषयी वेडे-वाकडे बोलत असल्याचे ऐकून नामदेवाना उद्‌वेग आला. पण मनाचा हिय्या करून ते नागनाथाच्या मंदिरात आले. तिथे अंधाऱ्या गाभाऱ्यात विसोबा खेचर पादत्राणासकट पिंडीवर पाय ठेऊन डोके जमिनीवर ठेऊन झोपल्याचे त्याना दिसले. उन्हातून आल्यामुळे आपणास भ्रम झाला असावा असे नामदेवाना प्रारंभी वाटले, पण डोळे सरावल्यानंतरही तसेच दृष्य दिसताच लोक विसोबाखेचराविषयी वेडेवाकडे का बोलत होते याचा खुलासा झाला. आणि अशा वेडपट माणसाला गुरू करायचे म्हणजे अवघडच असे त्याना वाटू लागले.

विसोबा खेचरानी नामदेवांची ही दोलायमान अवस्था ओळखली आणि ते नामदेवाना म्हणाले, जिथे पिंडी नाही अशा ठिकाणी माझे पाय उचलून ठेव. नामदेवानी तसे प्रयत्न करताच त्याना प्रत्येक ठिकाणी पिंडी दिसे. नामदेव प्रयत्न करुन थकल्यावर विसोबा खेचर म्हणाले,

> 'मी' पण भुललो । मज नकळेची कांही ।
> देव नसे ते ठायीं । पाय ठेवी ।।

असे जे मी म्हणालो त्यामध्ये 'मी' पणा संपावा असा हेतू आहे. परमेश्वर सर्वत्र भरून आहे एवढे जरी समजले तरी पुरे.

विसोबांच्या या उक्तीने नामदेव काय समजायचे ते समजले. त्यांचा अहंकार सरला. विसोबानी नामदेवाच्या मस्तकी हात ठेवताच गुरुकृपेने नामदेव अद्वैतवादी झाले आणि–

> 'मी' 'माझे' होते । ते मजमाजी निमाले ।
> जळे जळ गिळिले । जयापरी ।।

अशी नामदेवाची अवस्था झाली. एकदा अशी अवस्था प्राप्त होताच ज्ञानदेवानी नामदेवाना आपल्या परिवारातले मानले. आणि इथूनच नामदेवांचे कर्तृत्व फळाला येऊ लागले.

' मी ' माझेपण गळाल्याने आपपर भाव शिल्लक रहात नाही. संतसंग सतत घडत रहावा अशी अवस्था येत जाते. नामदेव अशा अवस्थेप्रत आल्याने ज्ञानदेव आणि इतर संतासमवेत भारत यात्रेत सामील झाले.

भारतभ्रमण करीत असता समाजस्थिती कशी आहे याचे दर्शन घडणार होते. सद्य:स्थिती कोणते रूप धारण करील याचे भान येणार होते. पुढे काय करावे लागेल याचे ज्ञान होणार होते. ज्ञानेश्वर आपल्या द्रष्टेपणाने नामदेवाकडून काही महत्त्वाचे कार्य करवून घेणार होते, यातले मर्म फारच थोड्याना कळणार होते.

परपांगी तीर्थयात्रा हे स्वरूप असले तरी अंतरंगी सारा भारत एकजिनसी राखण्यासाठी कराव्या लागणाऱ्या प्रयत्नाचे ते रूप होते. मुस्लिमांची आक्रमणे वाढत जाऊन सनातन वैदिक धर्मावर आघात होऊन सारी समाजव्यवस्था ढासळण्याच्या आधीच त्या आक्रमणास पायबंद घालणे आवश्यक होते सामान्य माणसास पेलेल, रुचेल, असा मार्ग अवलंबिणे अत्यंत महत्वाचे होते. ज्ञानेश्वर स्वत: ज्ञानमार्गी असल्याने त्यांचा मार्ग सामान्याना पचनी पडणारा नव्हता. ते ज्वलंत रसायन सौम्य करून स्वादयुक्त करणे हाच मार्ग होता. ज्ञानमार्गाचे स्वादयुक्त रसायन म्हणजेच भक्तीमार्ग होय. सामान्याना ते आहार्य करून देऊन आपले ईप्सित साध्य करण्याचे कार्य ज्ञानेश्वर नामदेवाकरवी करुं इच्छित होते. नामदेवांचे कर्तृत्व ज्ञानेश्वराना माहित होते. या डोळसपणाला जर अनुभवाची जोड दिली तर ईप्सित पूर्ण होणार होते. म्हणून ज्ञानेश्वरानी तीर्थयात्रेचा घाट घातला.

लोकमानसात नामदेवाच्या भक्तीश्रेष्ठतेला खतपाणी घालून ज्ञानेश्वरानी नामदेवासमवेत भारतयात्रा पूर्ण केली.

नामदेव भारतयात्रेत जरी सामील असले तरी त्यांचे चित्त पंढरीत रमायचे ते म्हणायचे.

पंढरी हे क्षेत्र । पावन पवित्र ।
महिमा विचित्र । त्रिभुवनी ।।
पाहिलिया क्षमी । नासती पातके ।
ऐसियासी तुके । दुजे कोण ?

पण भारतयात्रा पूर्ण झाल्यावर मात्र त्यांचे चित्त शांत झाले पण तेही क्षणभरच. कारण तीर्थयात्रा संपताच ज्ञानेश्वरानी सर्वांचा निरोप घ्यायचे ठरविले.

ज्ञानेश्वरानी सर्वांचा निरोप घ्यायचा असे ठरवताच सर्वजण व्याकूळ झाले. आजपर्यंत हे संत म्हणजे

सुखाचे सोयरे   भेटती अंतरी
बाहेरी भीतरी   दिधलें क्षेत्र

अशा अवस्थेपर्यंत आणून पोहोचविणारे कुटुंबीय वाटत.

या सुखाच्या सोयऱ्यांत गोरोबा-काका कुंभार, सावंता माळी चांगा वटेश्वर, विसोबा खेचर, सोपानदेव अशी नामवंत मंडळी होती. ज्ञानदेवासंबंधी तर काय बोलायचे ? ते तर जीवीचा जिव्हाळा होते. आणि अशा जीवीच्या जिव्हाळयाने सर्वांचा निरोप घ्यायचा म्हणजे फारच झाले. नामदेवाना हे सहन करण्याच्या पलीकडचे वाटू लागले.

निवृत्तीनाथानी जेव्हा समाधीवर शिळा घातली तेव्हा

सोपान मुक्ताई । सांडिती शरीरा ।
म्हणती धरा धरा । निवृत्तीसी ।।
आणिकांची तेथे । उग्दिग्न ती मने ।
घालितातीं सुमने । समाधीसी ।।

असे दृश्य दिसू लागले. नामदेवानी भावनानी पूजा केली पण त्यांच्या मनाला फार लागले. ज्ञानेश्वरांची संगत एवढी अंतरंगात भिनली होती की तिला बाहेर काढणे अशक्य होई. पदोपदी ती आठवण शब्दरूपानी बाहेर येई. यातून एक अत्यंत श्रेष्ठ गोष्ट निर्माण झाली.

नामदेवानी संपूर्ण ज्ञानेश्वरांच्या जीवनाचा आलेखच तयार करून पुढील पिढीवर उपकार करून ठेवले.

नामदेव एवढयावरच थांबले नाहीत. त्यानी निवृत्ती, सोपान, चांगदेव, मुक्ताबाई याविषयी लिहून ठेवले. नामदेवानी केलेली ही रचना अत्यंत हृदयंगम अशी आहे. या दृष्टीने त्यांचे कार्य असामान्यच आहे. नामदेव इतिहासकार होत यात संशय नाही.

ज्ञानेश्वरादि संतांचे कार्य पुढे चालू राहिले पाहिजे असे वाटल्याने आणि ज्ञानेश्वराबरोबर केलेल्या तीर्थयात्रेमुळे आलेल्या डोळस दृष्टीमुळे नामदेव उत्तरेकडे वळले. ज्ञानेश्वरांच्या संजीवन समाधी–नंतर केवळ चार वर्षांच्या आतच सारा महाराष्ट्र यावनी सेनेने झोडपून काढला. या यावनी आक्रमणाला अद्वितीय शक्तीनेच थोपविण्यासाठी नामदेव सज्ज झाले. आपल्या सगुण उपासनेने हा तडाखा सोसता येईल असे त्याना वाटले.

ज्ञानेश्वरांच्या पाठोपाठ एक एक संतरत्ने निखळून पडत होती. उत्तर भारत पेटलेल्या अवस्थेत होता. प्रबोधन करणे आवश्यक वाटत होते.

पेटलेला उत्तर भारत शांत करणे म्हणजेच प्रबोधन करणे होय. याची जाण आली आणि सगुण भक्तीची पताका खांद्यावर घेऊन नामदेव पंजाबात पोहोचले.

तिथे जाताच ते म्हणू लागले-

तू अगाध बैकुंठनाथा । तेरे चरनो मेरा माथा ।
सरबे भूत नाना बेष । जत्र जाऊ तत्र तू ही देषू ।।
जलथल महीथल काषट पषानां । आगम निगम सब बेर पुरानां ।
मैं मतिया जनम निरबंधज्वाला । नामा का ठाकुर दीनदयाला ।।

वकुंठनाथा तुझा महिमा अगाध आहे. तुझ्या चरणावर माझे मस्तक ठेवित आहे हीं सगळी माणसे नाना वेषांची वाटतात तसेच तुझे आहे. जिथे जिथे मी जातो

तिथे तिथे तू मला दिसतोस. जळी, स्थळी, पृथ्वीवर, काष्टी, पाषाणी आगम निगम इत्यादि वेदांमध्ये पुराणामध्ये तू दिसतोस. माझ्या मनामध्ये अशी इच्छा आहे की जन्माच्या या निर्बंधातून तू सोडवावेस. नामदेवांचा ठाकूर एवढा दीनदयाळू आहे हे निश्चित.

पेटलेला पंजाब शांत करीत ज्ञानेश्वरानी ज्या उद्देशाने पंजाब यात्रा निच्छित केली होती तो हेतू साध्य करीत नामदेव संपूर्ण पंजाब फिरले.

तिथे शिष्यपरंपरा निर्माण करून त्यांनी पुनः पंढरीस प्रस्थान ठेवले. कारण त्यांना सारखे वाटे

हेचि देवा मागत । चरण सेवा अखंडित ।
वास द्यावा पंढरीचा । सदा संग हरिदासाचा ।।

पंढरीस येण्याआधी पंजाबातील आपल्या बांधवाना ते सांगून आले होते-

भाई रे भरम गया, भव भागा ।
तेरा जन जहाँ का तहाँ जाई लागा ।।

समाजाला आश्वासन देत ते पंजबात १८-२० वर्षे राहून लोकांच्यातला विश्वास जागवून पंढरपुरला परतले. प्रबोधनाचे कार्य सातत्याने पुढे चालू राहील अशी व्यवस्था करून नामदेव परतले. पंढरीरायाला ते म्हणत-

घालिन लोटांगण वंदिन चरण
डोळयाने पाहिन रुप तुझे
प्रेमे आलिंगन आनंदे पूजिन
भावे ओवाळिन म्हणे नामा

पण हे केवळ पंढरीरायापुरते लागू नव्हते. त्याच्यापुढे सगळा भारतदेश उभा होता. त्याला उद्देशून ते तसे म्हणत. भक्तीमार्गाची ही ध्वजा खऱ्या अर्थाने राष्ट्रप्रेमाची ध्वजा होती. ती त्यानी खांद्यावर

वाहिली. देशाला येऊ पाहाणाऱ्या ग्लानीवर उतारा दिला आणि विठुरायाच्या महाद्वारावर येणाऱ्या जाणाऱ्या भक्तांची पायधूळ आपल्या मस्तकी पडावी म्हणून विश्रांती घेतली. आषाढ शुद्ध एकादशी म्हणजे शयनी एकादशी. त्या दिवशी त्यानी शयनाचा विचार केला.

आषाढ वद्य एकादशी म्हणजे ' कामिका ' एकादशी. कामना इच्छा पूर्ण करणारी एकादशी.

ती केली. द्वादशीस पारणे सोडले आणि त्रयोदशीच्या दिवशी ते शयनी पहुडले ते कायमचे. शके १२७२ चा हा दिवस सांगत होता–

' तत्वमसि ' वाक्य उपदेशिले तुज ।
ते तू जीवी का असून धरिशी दूर ? ॥
त्रिभुवनापरता धावतोसी बुरी ।
आधीं तू आपुली शुद्धी करीं ॥

आपली शुद्धी करून इतरांचे प्रबोधन करीत नामदेव विश्रांती घेत म्हणत होते–

पांडुरंग, पांडुरंग, पांडुरंग ! !

ऊंस डोंगा परी

चोखा

लोक म्हणतात तेच खरं !

नदीचे मूळ आणि ऋषीचे कूळ शोधू नये !

भक्त कबीर सांगून गेले नाहीत का ? –

> जाती न पूच्छो साधूकी
> पूछ लीजियें ज्ञान !
> मोल करो तलवार का
> पडो रहन दो म्यान !

साधू कोणत्या जातीचा आहे असे विचारण्यापेक्षा त्याचे ज्ञान किती अथांग आहे हे पाहावे. युद्धप्रसंगी म्यान उपयोगी पडत नाही. तिच्या आत असणाऱ्या तलवारीचे पाणी महत्वाचे असते.

साधूच्या जातीवरून त्याची श्रेष्ठता ठरत नसते. त्याचे ज्ञान, त्याची योग्यता ठरवत असते. शेख महंमद मुसलमान असूनही इथे यायचे.

नियमाने वारी करणाऱ्या संतामध्ये त्याना ते मुसलमान म्हणून कमी लेखले गेले नाही. ते सरळ म्हणत–

ऐसे केले या गोपाळे
नाहो सोवळे ओवळे

या गोपाळाजवळ सोवळे-ओवळे, आप-पर भाव किंवा आपला-परका असा प्रकार नाही. सारे त्याला सारखेच. ' योमद्भक्त: स मे प्रिय: ' असे तो म्हणतो. त्याचा जो कोणी भक्त तो त्याला प्रिय. म्हणून तर शेख महंमद म्हणतात–

शेख महंमद अविंध
त्यांचे हृदयी गोविंद

शेख महंमद मुसलमान असले म्हणून काय झाले ? त्यांच्या बाह्य स्वरूपाकडे पाहू नका. त्यांच्या हृदयात गोविंद आहे हे लक्षात घ्या. शेख महंमदाचे हे म्हणणे मला पटले.

अंतरंगात काय आहे हे महत्त्वाचे ! तसं नसतं तर माझ्यासमोर असणाऱ्या या नामदेवांच्या पायरीकडे लोकानी दुर्लक्ष केलं असतं. तसाच प्रकार माझ्यासमोर असणाऱ्या पण रस्त्याच्या दुसऱ्या टोकास असणाऱ्या चोखोबा बद्दल झाला असता.

माझंच पहा ना !

मला विठ्ठलमंदिराचे महाद्वार म्हणतात !

मलाच महाद्वार का संबोधायचे ?

पंढरपुरामध्ये आल्यानंतर पंढरीनाथाचे दर्शन घेण्यासाठी दक्षिण, पश्चिम, उत्तर दिशाना देऊळ वाड्याला जाण्यासाठी दरवाजे नाहीत काय? त्या दरवाजामधून सुद्धा प्रवेश करून पंढरीनाथांचे दर्शन घेता येतेच ना? मग मलाच महाद्वार का म्हणायचे?

बहुसंख्य भक्त माझ्या खालून विठ्ठलाचे सावळे, गोजिरे रूप पाहण्यास येतात म्हणूनच ना ? पण असे असले तरी त्या इतर

द्वारांचे महत्त्व कमी ठरत नाही. जो तो आपआपल्या परीने कार्यरत असतोच की ज्याचे त्याचे भोग ज्यांचे त्याला भोगावे लागतातच की!

मी हे सारे सारे किती तरी शतके पहात आलो आहे. भक्तांच्या चरणांची धूळ सदैव लागावी म्हणून नामदेवानी इथं जागा मागितली. आपल्या सहोदरानी काय करावे हे ज्याचे त्याच्यावर सोपवून नामदेवानी इथं विश्रांती घेतली. पण, त्यांच्या कुटुंबियानी तोच मार्ग अनुसरला. आपल्या गुरूचे दर्शन सतत घडावे अशी मनोमनीं इच्छा व्यक्त केल्याने की कशाने हे सांगता येत नाही. मात्र आपल्या शिष्याची ती आंतरिक तळमळ जाणूनच जणू नामदेवानी आपल्या शिष्याची इच्छा त्याच्या मृत्यूनंतर कितीतरी वर्षांनी पूर्ण केली असेल का असा मला नेहमी प्रश्न पडतो.

माझ्यासमोर उभे राहून किती भक्तानी तळमळून त्या सुखाच्या सिंधूराशीचे दर्शन घेण्याचा प्रयत्न केलाय हे मी अनुभवलं आहे. किती भक्तांची नावे घ्यावीत, किती आर्तांची सूची करावी याला गणती नाही.

नाही म्हणायला रोज सय येतेय त्या समोरच्या भक्ताची !

ज्याला नामदेवानी ' विठ्ठल ' असा मंत्र देऊन गुरुपदेश दिला त्या चोखोबाची !

मी त्यांची समाधी कमीतकमी सहा शतके पहात इथं उभा आहे. ज्याना मंगळवेढयाहून आणून इथं चिरनिद्रा दिलीय त्या चोखोबा-विषयी तसी मला फारच थोडी माहिती आहे त्यांची समाधी रोज पाहतोय अन् मनी आठवतोय एकच गोष्ट !

इथं फुललाय सामाजिक व्यवहारातील श्रेष्ठता, नीचता, जिथे नष्ट झाली असून समानता हा एकच ज्याचा विशेष आहे असा संप्रदाय ! भक्ती संप्रदाय !!

या संप्रदायात कोण कोण आहेत ? ब्राह्मण आहे तसा शूद्रही आहे, जसा शेतकरी आहे तसा वैश्य आहे. जसा पुरुष आहे तशी स्त्री आहे. संसारी लिप्त आहे तसा असंसारी अलिप्त आहे. गृहिणी आहे तशी गणिका आहे.

ज्याला जसं भावलं तसं त्यानं रूप पाहिलं त्या भावनेनं त्यानं भजन केलं. कोणी द्वारी उभे राहून मनोमनी रूप न्याहाळलं. तर कोणी गर्भगृहात राहून त्याला डोळ्यांत साठवलं.

कुणाला ' रूप पाहता लोचनी सुख झाले हो साजणी , असं म्हणता आले. तर कोणी म्हटले ' मज दूर दूर हो म्हणती, तुज भेटू कवण्या रीती '

पण हे असे असले तरी सारे श्रेष्ठच होते. सगळेच भक्त असल्याने पंढरीरायाला प्रिय होते.

तिथे कोणी नाही नीच वा कोणी श्रेष्ठ !

सामाजिक उच्चनीचता तुम्ही आम्हीं केलेली !

पंढरीनाथासमोरचे म्हणून मला ' महाद्वार ' म्हणतात तसाच तो प्रकार. देऊळवाड्याला इतर दारे आहेत. त्या दाराने प्रवेश करता येतो आणि दर्शन घेता येतेच की. तसाच प्रकार तुम्ही आम्ही या जातीसंबंधात केला आहे असे मानले तर ? शेवटी एकाच ठिकाणी नाही का जायचे ?

आणि म्हणूनच माझ्यासमोर असणाऱ्या या चोखोबांच्या समाधीकडे जेव्हा जेव्हा मी पाहतो तेव्हा तेव्हा चोखोबांची ही समाधी अस्पष्ट होत जाते अन् माझ्यासमोर उभा राहतो तो एक तळमळून भजन करणारा हरिजन– हरीचा जन !

पांडुरंग हरी ! वासुदेव हरी ! म्हणणारा संत ! मंगळवेढ्याहून वेड्या आशेनं येणारा, माझ्यासमोर उभं राहून ईशचिंतनात मग्न असणारा चोखोबा.

चोखोबाबद्दल मला खूप जाणून घ्यावसं वाटतं पण त्यांच्याविषयी फारच थोडे समजे.

या पंढरपूरापासून आग्नेय दिशेस असणारे मंगळवेढे तसे खेडेगावच! या खेडेगावात त्यांचा जन्म झाला एवढेच समजे. कधी झाला माहीत नाही. कोणत्या तिथीस हे ज्ञात नाही.

नाही म्हणायला जसं जसं समजूं लागलं तसं तसं चोखोबा इकडे येऊं लागले. एवढं आठवतंय

आठवणीना ताण देऊन पाहिले तेव्हा अंधुकसं आठवतंय. ज्ञानेश्वरादि भावंडे जेव्हा जेव्हा पंढरीस यायची त्यात हा भक्त असायचा. कारण ते स्वत: ज्ञानेश्वरांच्या संजीवन समाधी सोहळयास उपस्थित असावेत अशी शंका येते. चोखोबा स्वत: म्हणत-

ज्ञानेश्वर नामे धरिला अवतार
क्षेत्र अलंकापूर इंद्रायणी
... ...
... ...
बारा शते अठरा शक शालिवाहन
दुर्मुख अभिधान संवत्सर
कृष्ण त्रयोदशी कार्तिक मास
बैसे समाधीस ज्ञानेश्वर
जातीहीन चोखा विनवी जोडुनि कर
समाधी निर्धार संजीवनी ॥

मला वाटते चोखोबांचे हे म्हणणे त्यांनी तो प्रसंग प्रत्यक्ष पाहून लिहून ठेवला असावा

सर्व दिवसभर काम करीत मुखी पंढरीरायाचे नाम घेत चोखोबा आपली कालक्रमणा करीत असले पाहिजेत. याच अवस्थेत असता संसाराच्या त्रासाने हे गांजले देवाचे दर्शन घेऊन चित्तास समाधान द्यावे म्हटले तर जात आडवी यायची.

कुणी काही बोलले ‘ बाजूस सर ’ म्हटले तर

चोखा म्हणे विटाळ
आम्हा पूर्वीचे हे फळ

असे म्हणायचे आणि आपल्या भजनात गुंग असायचे. पण हे असं पूर्वीचं फळ कशामुळं मिळालं असा प्रश्न केला तर म्हणत–

शुद्ध चोखा मेळा करी नामाचा सोहळा
यातीहीन मी महार पूर्वी निळाचा अवतार
कृष्णनिंदा घडली होती म्हणोनि महार जन्मप्राप्ती

आणि तो विचार नियंत्र झटकून टाकून पुन: भजनात गुंग असायचे. लोकानी धि:कारलं म्हणून कधी दु:ख केल्याचं आठवत नाही. कारण ते म्हणायचे–

जन्माचे साकडे । नाही माझे कोडे ।
जेसे तुम्हा पडे । ओझे देवा ।।
कोणत्याही कुळी । उंच नीच वर्ण
हे मज कारण । नाही त्याचे–

त्यांनी कुणालाही दूषणे दिली नाहीत पण त्यांना संसारताप खूप होई. त्यांची पत्नी सोयरा ही तर फार सोशिक ती आपली नणंद निर्मला, भाऊ बंका, मुलगा कर्ममेळा नवरा चोखा या साऱ्यांचे करी. घरी असणाऱ्या तुटपुंज्या साधनांनी ती कसाबसा संसार ओढी. ती पण सहन करून करून थकली.

चोखोबा तिची ओढगस्त पहात. आणि मनी म्हणत-

आजवरी पडलो लिगाडाचे गुंती
तेणेंची फजिती जाली असे
जाला दिसे मज मोकळा मोक्षमार्ग
धिक्कारीत जन जाने पुढे

एका अर्थाने हा पळपुटपणाच होता. त्या विचाराने ते पंढरीस नेमाने येत राहिले. आपल्या पतीची पंढरीची वारी या सोयरा बाईला बरेच सांगून गेली. आपलं पती भगवद्भक्त होत आहे हे तिला जाणवले. आपल्या पतीच्या मार्गांत आपण धोंड होऊ नये ही तिची इच्छा तर होतीच. उलट त्यांच्या मार्गात सहाय्यभूत व्हावे अशी तिची मनोमन इच्छा असली पाहिजे. आपल्या पतीला मोकळीक दिली पाहिजे एवढेच तिला वाटले असे नाही, तर ती सुद्धा या संसार बंधनातून मुक्त होऊ इच्छित होती, आपल्या पतीचा मार्ग सुयोग्य आहे हें तिला जाणवताच ती स्वत:शी म्हणत होती-

माझे माझे म्हणुनी गुंतले हांवभरी
वाया या संसारी मृगजळी
आपली आपण करा साठवण
संसार बंधन तोडा वेगी
नाम निजनौका विठ्ठल हे तारु
भवाचा सागरू उतरील
हाचि विश्वास धरावा अंतरी
म्हणतसे महारी चोखयाची

ती केवळ मनातच असे म्हणून थांबली नाही. आपल्या पतीला जेवढे सहाय्य करता येईल तेवढे तिनं केलं. याचा परिणाम असा झाला की, चोखोबा निवांतपणे पंढरीला येऊ लागले आणि जेव्हा मंगळवेढ्यात कोणी एखादा वारकरी भेटे तेव्हा म्हणू लागत-

आजि दिवस । धन्य सोनियाचा ।
जिवलग विठोबाचा । भेटलासे ।।
तेणे सुख समाधान । जाहली विश्रांती ।
दुजे नाठवे चित्ती । कांही एक ।।

असं त्याचं पंढरपूर- मंगळवेढा जाणं येणं होई. चालूच असे पंढरपुरास आले की ते विशेष आनंदी असत. माझ्यासमोर उभे रहायचे आणि पंढरीरायाला म्हणायचे.

किती किती लडिवाळे ।
कवतुके पुरवले लळे ।। १ ।।
तया परिस तुझे घरी ।
भुललासे देखो हरी ।। २ ।।
नावडे आसन वसन ।
नावडेचि सिंहासन ।। ३ ।।
भूक ताहान नाठवे काही ।
चोखा म्हणे नवल नाही ।। ४ ।।

पंढरीरायासमोर आले की त्यांची तहानभूक हरपायची यात नवल ते कसले. ?

आपल्या अदम्य निष्ठेने ते पंढरीरायाची आळवणी करीत. त्या आळवणीने पढरीनाथ बहुतेक प्रसन्न झाले असावेत आणि त्यानी एक नवल घडवले असले पाहिजे. कारण त्या दिवशी चोखोबा म्हणत होते.

मज तो नवल । वाटतसे जीवी
आपूले पदवी । विसरले ।।
कवणिया सुखा । परब्रह्म भुलले ।
गुंतोनी राहिले । भक्त भाके ।।
निर्गुण होते ते । सगुण पै झाले ।
विसरून गेले । आप आपला ।।
चोखा म्हणे हा । कैसा नवलाव ।
देवाधिदेव । वेडावला ।।

स्वत: महार जातींत जन्माला आल्याने. आणि त्यामुळे विठ्ठलाला प्रत्यक्ष पाहण्याचे, भाग्य आपणाला लाभत नाही या कारणाने व्याकूळ होणारे चोखोबा नवल घडले असं म्हणत होते. यात निश्चित अर्थ असला पाहिजे. ते पंढरीरायाची एवढया तन्मयतेने भक्ती करीत की त्या उज्वल भक्तीने प्रभावित झाल्याने. श्री पंढरीनाथ स्वत:ला चार भिंतीत बंदिस्त करून घेऊन स्वस्थ बसू शकले नाहीत.

पंढरीनाथ स्वत: बाहेर आले. आपल्या भेटीसाठी आसुसलेल्या त्या भक्ताला दर्शन देण्यावाचून आता गत्यंतर नाही या विचाराने त्यानी माझ्यासमोर उभ्या असणाऱ्या चोखोबाना दर्शन द्यायचे ठरवले आणि तशी संधी घेतली. दिवसा उजेडी दर्शन दिले तर नको त्या माणसांना सुद्धा हे अनाकलनीय रूपदर्शन घडल्याने मुक्ती मिळण्याची शक्यता असल्याने, सारा परिसर शांत झाला असता केवळ आपल्या आर्त भक्ताला दर्शन देण्यासाठी त्यानी गाभाऱ्यातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला.

चोखोबा शांतपणे झोपी गेले होते. माझ्यासमोरची नित्याची वर्दळ केव्हाच सरली होती. अंगाचा मुटकुळी करून झोपी गेलेल्या चोखोबाला पंढरीनाथानी मोरपिसांचा स्पर्श करून उठविलं. प्रत्यक्ष पढरीनाथ समोर उभे आहेत आणि आपल्याकडे बघून स्नेहार्द्र दृष्टीने मंदस्मित करताहेत हे पाहून चोखोबाना धन्य वाटले. निर्गुण मूर्ती सगुण रुपाने साक्षात उभी असल्याचे पाहून प्रारंभी चोखोबा क्षणभर चक्रावले. आपण स्वप्नांत तर नाही ना असं त्याना वाटलंच. पण मोरपिसांचा स्पर्श अंगाअंगावर रोमांच उठवून गेल्याने पुलकित झालेल्या शरीराने, सहस्त्र कोटी सूर्याच्या प्रभेइतके तेज आसमंतात पसरलेले डोळयानी पाहिल्याने, सगळीकडे एक अनाकलनीय, प्रफुल्लित करणारा सुगंध पसरल्याची जाणीव झालेल्या नासिकेने, तसाच एक अनाहत नाद सातत्याने कर्णरंध्री घुमत असल्याची संवेदना निर्माण झाल्याचे श्रोत्रानी सांगितल्याने, जिव्हा सातत्याने त्या अनादि अनंत परब्रह्माचे नामस्मरण करीत असल्याचे बोलू लागल्याने चोखोबा आपले अस्तित्व विसरले.

जीवनात जे हवे असे वाटत होते ते लाभल्याने चोखोबा मंत्रमुग्ध होऊन त्या सावळया परब्रह्मास डोळयात, कर्णात, मनात साठवीत म्हणत होते—

नवल पाही । नवल पाहीं ॥
पाहो जावे तेजे । पाहिले नाही ॥
निर्गुणी सगुण । सगुणी निर्गुण ।
दोहीचे कारण । तेच ठायी ॥
चोखा म्हणे पहाता । पाहणे लपालें ।
हृदयी बिंबले । हृदयची ॥

निर्गुण मूर्ती सगुण रूपाने प्रत्यक्ष पुढे उभी ठाकल्याने स्तब्ध उभं राहिले.

पंढरीरायानी आपणास दर्शन दिले असं चोखोबा उद्या सांगत सुटले तर लोक विश्वास तर ठेवणार नाहीतच उलट त्यांची टवाळी करतील. त्याना त्यांचा जीव नकोसा करतील. त्यांची अवहेलना करण्यास कारणीभूत होऊं या विचाराने आणि पंढरीरायानी आपणास खरोखरच प्रत्यक्ष दर्शन दिले याचा पडताळा मिळावा म्हणून, तसेच लोकांचाही त्यांच्या वचनावर विश्वास बसावा या उद्देशाने पंढरीनाथानी आपल्या गळयातील हार चोखोबांच्या गळयात घातला. चोखोबांबरोबर काही गुजगोष्टी केल्या आणि मध्यरात्र टळताच पंढरीनाथ पुन: आपल्या स्थानी परतले. चोखोबा शांत चित्ताने पुन: तिथेच झोपी गेले. गळयातील हारामुळे काय घडेल याचा विचार दोघांच्याही मनात आला नाही. दोघाना त्याची आठवण झाली नाहीच. आत्मा परमात्म्याच्या सुखसंवादामध्ये हाराचा विषय बाजूस पडला असणे शक्य आहे. चोखोबा आपल्या स्वानंदात मग्न होऊन निद्रावश झाले. तिकडे श्री पंढरीनाथ पुन: भक्तासाठी, ठेऊनि कर कटी भीमा तटी स्तब्ध होऊन निर्गुण होऊन उभे होते.

पहाटेच्या वेळी नित्याप्रमाणे बडवे काकड आरती करीत (म्हणून) पंढरीनाथाना जागे करण्यास आले. आणि त्यांना आश्चर्याचा धक्का बसला. पांडुरंगाच्या गळयातील रत्नहार गायब झालेला त्यांना दिसला. पहाटेच्या शांत वेळी त्याना दरदरून घाम सुटला. त्यांना

वाटले रत्नहाराची चोरी झाली. एकच गोंधळ माजला. कशीबशी काकड-आरती संपली आणि रत्नहाराची शोधाशोध सुरू झाली. हळू हळू कुजबुजीचे रुपांतर गलबल्यात झाले. चंद्रभागेवरून येणाऱ्या जाणाऱ्यांच्या तोंडी तोच विषय झाला. आणि जो तो मोठ्याने चर्चा करू लागला.

एका भक्ताचे लक्ष सहज चोखोबाकडे गेले. पहाट संपली होतीच सकाळच्या त्या प्रकाशात चोखोबांच्या गळ्यात चमचमणाऱ्या टपोऱ्या रत्नहाराने सर्वांचेच गोळे दिपवले.

हार सांपडल्याचा आनंद एकीकडे होता तर चोखोबाने चोरी केल्याबद्दल त्वेष दुसरीकडे होता.

संतापाने त्या सर्वांनी चोखोबाला बदडायला प्रारंभ केला. काही घटिकाच आधी अमृतमय स्पर्श ज्या शरीराला झाला होता त्याच शरीराला आता लाठ्या-काठ्यानी बदडायला प्रारंभ केला होता. मी हे सारे मूकपणाणे पहात होतो.

मी निर्जिव ना ?

पंढरीनाथानी स्वत:च्या हातानी तो रत्नहार चोखोबांच्या गळ्यात घातलेला मी पाहिला होता. चोखोबा चोर नसताना त्याना चोर समजून बदडणे चालूच होते. मी साक्षी असून काहीच करूं शकत नव्हतो. मला वाचा असती तर ओरडून सांगितलं असतं ' अरे, चोर कधी चोरीचा माल गळ्यात घालून मिरवतो का ? इथं तर चोखोबा राजरोसपणे विसावले आहेत निदान एवढा विचार करून तरी चौकशी करायची, तसेही नाही करीत. अन् खुशाल संन्याशाला सुळी देता ? '

मला किती वाईट वाटलं हे सांगू शकत नाही. मी निर्जीव होतो याचा मला खेद नव्हता. ज्ञानेश्वरानी त्या निर्जीव भिंतीला सजीव

करूनच तिच्यात चैतन्य ओतूनच चिरंजीवित्व नाही का दिले? एवढे कुठले आलेय माझे भाग्य ?

मुकाट्याने चोखोबाना मिळत असणारा प्रसाद पहात होतो आणि त्या मारामुळे डोळयात प्राण आणून विव्हळ मनाने चोखोबा करीत असलेली विनवणी थंड कानाने ऐकत होतो.

वडवे चोखोबाना मारत होते चोखोबा मी चोर नाही, मी चोर नाही म्हणत पांडुरंगाला विनवीत होते–

धाव घालीं विठू आता चालु नको मंद ।
बडवे मज मारिती ऐसा कांहीतरी अपराध ॥
विठोबाचा हार तुझे कंठी कैसा आला ।
शिव्या देती महारा म्हणती देव बाटविला ॥
अहो जी महाराज तुमचे द्वारीचा कुतरा ।
नका जी मोकलू चक्रपाणी जिमेदारा ॥
जोडोनिया कर चोखा विनवितो देवा ।
बोलिलो उत्तरे जरी राग नसावा ॥

पांडुरंग थंड मनाने चोखोबाला मिळत असणारा मार पहात होते. त्याना त्या क्षणी काहीच करता येत नव्हते. पण एका भक्ताच्या मनात ते शिरले. त्यांनी सर्वांना ओरडून सांगितलं, ' अरे चोर चोरी करून राजरोसपणे इथं विसावेलच कसा ? कडचा कुलुपात ठेवलेला हार चोरीला जाईलच कसा ? चोखोबा तर रात्रभर इथेच असतात. त्यानी कधीही आपली मर्यादा सोडली नाही. ते देवाची एकही पायरी ओलांडत नाहीत. असे असता ते कुलूपबंद गाभाऱ्यात जातीलच कसे ? प्रत्यक्ष पंढरीनाथानीच त्यांना हार अर्पण केला नसेल कशावरून ? मध्यरात्रीला एक अनामिक सुगंध पसरल्याचा, अद्वितीय प्रकाश पडल्याचा, अगम्य अनाहत नाद झाल्याचा भास पुष्कळाना झालाय. ही इथली पदचिन्हे पहा, इथे समचरण उभे असल्याचा भास तुम्हाला नाही का होत ? प्रत्यक्ष पांडुरंग इथे आले असल्याचा हा पुरावा आहे. त्यानीच चोखोबांच्या गळयात रत्नहार घातला असला पाहिजे. '

असमंतात अनामिक सुगंध रेंगाळत होता. कोटी सूर्यप्रभा अस्पष्टपणे मागे राहिली होती आणि अनाहत ध्वनी गुंजत असल्याची जाणीव प्रत्येकाला होत होती. प्रत्येकाला मनोमनी हे पटले. चोखोबांची मारातून सुटका झाली पण ते मनात विव्हळले. इकडे पंढरीरायाला वेदना झाल्या. एका साध्या प्रसंगाने आपल्या भक्ताला त्रास सोसावा लागला या विचाराने पंढरीनाथानी दुसरा निश्चय केला.

ज्या योगे चोखोबांच्या वेदना कमी होतील आणि इतरांचा रोष पत्करावा लागणार नाही असं करायचं ठरलं.

आणि एके दिवशी चोखोबांच्या दारी पांडुरंग दत म्हणून उभे राहिले. चोखोबाला काय करावे हे सुचेना. पांडुरंगानी एकदा दर्शन दिल्यामुळे खरपूस मार खावा लागला होता. त्याची आठवण ताजीच होती. पुनः संकट उभे राहील काय अशी शंका त्यांच्या मनात आली.

पण आता तसा प्रसंग येणार नाही याचा विश्वासही होता. सोयरा चटकन पुढे धावली. तिने अश्रूंनी समचरण धुतले. पांडुरंगाना हा आदरसत्कार मोलाचा वाटला. तिथलेच पटकूर उचलून पांडुरंग खाली बसले आणि सोयरेस म्हणाले, ' भूक लागलेय, खायला दे '. सोयरेने घरात असणारे पीठ मळले आणि भाकरी करून वाढली. पंढरीराय आपल्या घरी आले पण आपण त्यांचे यथास्थित स्वागत करू शकत नाही या विचाराने सोयरा खंतावली आणि पंढरीनाथास म्हणाली,

> पुढे ठेवियलें पान । वाढी कुटुंबी भोजन ।।
> तुम्हा योग्य नाही देवा । गोड करोनिया घेवा ।।
> द्रौपदीच्या पाना । भुललेती नारायणा ।।
> येथे नाही ऐसी परी । बोले चोखयाची नारी ।।

पण पंढरीरायाना हे माहीत होते की ' पानात काय आहे याला महत्त्व नाही. कुणी आणि कोणत्या भावनेने वाढलेय हे महत्त्वाचे

असते.' सोयरेने श्रद्धायुक्त आणि आपुलकीने वाढल्यामुळे पंढरीनाथ संतुष्ट झाले आणि तिला म्हटले, ' सोयरे तू खरी गृहिणी आहेस तुझी परमब्रह्मप्राप्तीची वाटचाल अखंड राहील.'

पंढरीनाथ चोखोबाच्या घरी जेवावयास आले होते. ही बातमी बाहेर फुटलीच. ज्याला त्याला आश्चर्य वाटले. नामदेवांची दासी जनी म्हणू लागली–

यातीहीन चोखा मेळा । त्यासी भक्तीचा कळवळा ।।

त्यामुळेच तर

देव जेवितो त्याच्या घरा । त्याचा भक्तिभाव खरा ।।
देव बाटविला त्याने । ऐसे जनी गाये गाणे ।।

पण इथं जनाबाईना म्हणायचे आहे,

चोखा संत भला । तेणें देव भुलविला ।।

आणि त्यांचा गौरव करायचा आहे.

चोखोबांची ही देव भुलवणारी भक्तीच त्यांना नडली.

त्यांना पंढरी सोडून मंगळवेढयास यावे लागले

व्यथित अंतःकरणाने त्यानी पंढरी सोडली. याला दुसरे कारण घडले. पंढरीनाथ त्याच्या घरी जेवले याचा विषाद त्यांच्या जातीबांधवाना वाटला आणि त्यांची नाराजी त्याना पत्करावी लागली.

एकीकडे उच्चवर्णियाकडून अवहेलना तर जातीबांधवाकडून उपेक्षा. यामुळे चोखोबांचे मनस्वास्थ संपत चालले. मनावर चढलेले मळभ दूर करावे म्हणून चोखोबा निरनिराळया तीर्थ क्षेत्रांच्या यात्रेस निघाले.

पण या तीर्थयात्रेने त्याना मनःशांती लाभली असावी असे म्हणवत नाही. कारण ते म्हणायचे–

बहुत हिंडलो देश देशांतर।
परि मन नाहीं स्थिर झालें कोठे ॥
बहुत तीर्थे हिंडोनिया आलो।
मनासवे झालो वेडगळची ॥
बहुत प्रतिमा ऐकिल्या पाहिल्या।
मनाच्या राहिल्या येरझारा ॥
चोखा म्हणे पाहता पंढरी भूवैकुंठ।
मनाचे हे कपट दूर झाले ॥

तीर्थयात्रेला जाऊन चोखोबा पुनः पूर्वीच्याच ओढीने पंढरपुरास येण्यास निघाले.

निरनिराळया क्षेत्रानी, तीर्थानी त्याना मनःशांती लाभली की नाही हे मी कसे सांगू ? मात्र ते पंढरपुराकडे येण्यास निघाले हे खरे. जिथं त्याना मार खावा लागला त्या स्थलाकडेच त्यांचे पाय पुनः पुनः वळत होते. अन् तोंडातून शब्द बाहेर पडत होते.

टाळी वाजवावी गुढी उभारावी
वाट हे चालावी पंढरीची ॥
पंढरीची वाट कउलांची पेठ।
मिळाले चतुष्ट वारकरी ॥
पताकांचे भार मिळाले अपार।
होतो जयजयकार भीमा तीरी ॥
हरिनाम गर्जता भय नाही चित्ता।
ऐसे बोले गीता भागवत ॥
खट नट यावे शुद्ध होवोनी जावे।
दवंड पिटी भावे चोखामेळा ॥

चोखोबा पुन्हा पंढरीस आले याचे कारण 'हरिनाम गर्जता भय नाही चित्ता' असा त्यांचा स्वभाव झाला होता, ते पुनः पंढरीस आले आणि त्याना आपले इप्सित गवसल्याचा आनंद झाला. संत सहवासा साठी आसुसलेल्या चोखोबानी पंढरीत प्रवेश केला आणि म्हटले–

विठ्ठ विठ्ठ गजरी   अवघी दुमदुमली पंढरी ।
होतो नामाचा गजर   दिंड्या पताकांचा भार ॥
निवृत्ती ज्ञानदेव सोपान   अपार वैष्णव ते जाण ।
हरी कीर्तनाची दाटी   तेथे चोखा घाली मिठी ॥

चोखोबा पंढरीत आले. पूर्वीच्याच उत्साहाने माझ्यासमोर उभे राहून त्यानी उपासना आरंभिली. नामदेवानी त्यांना यापूर्वीच गुरुमंत्र दिला होता. त्याच्या आधारावर परमार्थाची वाटचाल चालू होती. कधी कधी ते पंढरीनाथाऐवजी आपल्या परमार्थाच्या वाटचालीत सहाय्य करणाऱ्या गुरुबद्दल म्हणत—

धन्य धन्य नामदेवा   केला उपकार जीवा ।
माझा निरसिला भेवो   दाखविला पंढरी रावो ॥
मंत्र सांगितला सोपा   निवारिले भवतापा ।
माझी कृपेची साऊली   चोखा म्हणे पान्हा धरली ॥

गुरुसान्निध्यात, संतांची चरणधूळ माथी मिरवीत पंढरीमध्येच आपली जीवीतयात्रा संपवून कृतार्थ व्हावे असा त्यांचा विचार होता म्हणून ते पंढरीस परतले. पण नियतीच्या मनात तसं नसावं असं दिसलं.

मंगळवेढ्यात जन्मलेला मंगळवेढ्यात संपावा असा जणू संकेत असावा.

मुसलमानांचीं आक्रमणे वाढत होती. देवगिरीच्या यादवांचे राज्य लयाला गेल्यामुळे तर विशेष चिंता वाढली होती

घरादारांचे, स्त्रियांच्या अब्रूचे रक्षण करणे क्रमप्राप्त होते. त्यातून एकच मार्ग दिसत होता— गावाभोवती कूप उभे करणे.

गावाभोवती तटबंदी करणे तसं सोपे नव्हते. परचक्रापासून रक्षण करण्याइतपत ती सुदृढ हवी होती. सगळ्यानीं आपला वाटा उचलायचा असे ठरले.

चोखोबा म्हणजे वेठीचे माणूस. त्याना पंढरपूराहून बोलावून

आणण्यात आले. गावावर येणारे संकट टाळण्याचे कामी आपला हातभार लागतोय या आनंदात पण पंढरी सोडून यावे लागले या वेदनेत चोखोबानी गावकूस बांधण्याच्या कामात सहाय्य करण्यास प्रारंभ झाला.

वैशाखाच्या रणरणत्या उन्हात गावकुसाचं बांधकाम चालू होतं. पावसांळा सुरू होण्याच्या आत ते बांधून पूर्ण होणे अगत्याचं होतं. म्हणून काम भरभर संपवण्याकडे अधिक लक्ष होतं. बऱ्याच वेळा कामाचा उरक व्हावा म्हणून ओल्या बांधकामावर दुसरा थर चढवला जाई. रणरणत्या उन्हामुळे ओला थर लौकर वाळेल हा विचार यामागे होता. बांधकाम जोरात होतं अचानक एक दिवस वळवाचा पाऊस आला.

थकल्या भागल्याना त्या पावसाच्या शिडकाव्याने बरं वाटलं. जणु शीण संपल्याचा आनंद त्याला द्यायचा होता. पावसामुळे तहानलेली जमीन शांत झाली. गुराढोरांना पाणी मिळालं पण काहीना चिंता वाटली.

असाच पाऊस सुरू झाला तर ?

बांधकाम लौकर संपवायला हवं होतं. त्यात खंड पडण्याची भीती वाटत होती. असाच पाऊस पुन: पडला तर साऱ्या बांधकामावर पाणी पडणार होतं.

गावचा मुखिया चिंतेने ग्रासला होता.

काम लौकर संपवावे असं त्याला वाटत होतं. पावसाळ्यापूर्वी सारी तटबंदी पूर्ण झाली तरच कामाचे सार्थक होणार होते एवढे कष्ट घेतल्याचे फळ मिळणार होते, नाहीतर साऱ्यावर पाणी फिरून सारे पुसून जाणार होते, श्रम वाया जाणार होते असं ज्याला त्याला वाटत होतं. वैशाख पौर्णिमा अशी उलटली, आता थोडेच दिवस उरले होते. थोडेच काम उरले होते.

वैशाख वद्य पंचमी उजाडली. आणि तिनं ठरवलं आजचा दिवस गाजवून सोडायचा !

'गांवकुसाचं बांधकाम संपवण्याची घाई करता काय ?' असं जणू तिला म्हणायचं होतं.

पांडुरंग हरी, वासुदेव हरी' म्हणत चोखोबा त्या कामावर खपत होते.

अन् अचानक काय होतंय हे कळायच्या आंत गावकुसाचा एक भाग कोसळला आणि साऱ्या कामावर पाणी पडलं. गावकुसाच्या ढिगाऱ्याखाली पुष्कळजण सापडले. किती सापडले गणती नाही. कमीत कमी २०-२५ जण गाडले गेले. गावकुसाचा ढिगारा उपसणे सहजासहजी शक्य नव्हते.

सोयरेच्या सौभाग्याला त्या दिवशी ग्रहण लागले ते पुनः सुटलेच नाही.

एकच हलकल्लोळ माजला. जो तो आपल्या माणसासाठी आक्रोश करूं लागला.

वैशाख वद्य पंचमी शके १२६० चा हा दिवस काही तरी अशुभ घेऊन आला.

हां हां म्हणता हे वृत्त पंढरपुरांत येऊन थडकले. नामदेव व्याकुळले पंढरीनाथ खंतावले. त्यानी नामदेवाना आज्ञाविले 'चोखोबाना इथं आण'

त्या गावकुसाखाली २०-२५ जण सहज सापडले होते. त्या गोष्टीला महिन्यापेक्षा अधिक कालावधी होऊन गेला होता. या २०-२५ जणामधून नेमके चोखोबाना ओळखून काढणे शक्य नव्हते. केवळ अस्थी ओळखणे अवघड आहे असं नामदेव म्हणताच पंढरीनाथ म्हणाले, 'नामदेवा, अरे तूंच नाही का त्याला 'विठ्ठल विठ्ठल' असा मंत्र दिलास ? चोखोबांच्या मनात त्या मंत्राशिवाय दुसरा

शब्द असणं शक्यच नाही. श्वासाश्वासाबरोबर ते ' विठ्ठल विठ्ठल ' म्हणत. त्यांच्या नसानसात तो गुरुमंत्र भरलाय. आता त्यांची नस नाही. पण त्या नसानसातून प्रवाहित झालेला गुरुमंत्र हाडात भिनलाय. त्या हाडामधून सुद्धा तुला विठ्ठल विठ्ठल असा मंत्र ध्वनी ऐकायला येईल. जा, तसा शोध घे आणि आण त्यांच्या अस्थींना.

नामदेव मंगळवेढ्यास गेले. त्यांनी त्या ढिगाऱ्यातून साऱ्यांच्या अस्थी बाहेर काढल्या. ज्या अस्थीमधून विठ्ठल विठ्ठल असा मंत्रध्वनी येत होता त्या नेमक्या चोखोबाच्या आपल्या शिष्याच्या अस्थी आहेत हे नामदेवाना ओळखता आले, ज्या हातांनी शिष्याला मंत्र दिला त्याच हातांनी त्याच्या अस्थी गोळा करण्याचा हा प्रसंग महान कठीण.

जड अंत:करणाने नामदेवानी त्या गोळा केल्या. बांधल्या आणि ते पंढरपुरास परतले. पांडुरंगानी आपल्या पीतांबरात त्या घेतल्या अन् नामदेवास ते म्हणाले, ' महाद्वारासमोर समाधीस्थान निश्चित केलंय तिथं त्या स्थापा.'

ज्या स्थळी चोखोबा मुटकुळी करून झोपले होते आणि जिथं उभे राहून मोरपिसांच्या स्पर्शानी पांडुरंगानी त्याला जागा केलं होतं, त्याच्याशी सुखसंवाद केला होता त्याच जागेवर पांडुरंगानी चोखोबांचे समाधीस्थान निश्चित केलं होतं.

नामदेवानी पंढरीनाथाच्या आज्ञेप्रमाणे माझ्यासमोर चोखोबांच्या अस्थी स्थापल्या. अन् समाधी बांधली.

चोखोबा धन्य झाले.

ज्या जागेवर परब्रह्माचं दर्शन घडलं. जिथं अणू अणू रोमांचित झाला त्या जागेत, पंढरी नगरीत चोखोबा विसावले. त्यांची इच्छाच तशी होती. लोक त्यांना नावे ठेवीत पण चोखोबा कधी संतापले नाहीत–

ते म्हणायचे–

> चोखा डोंगा परी भाव नोहे डोंगा
> काय भुललासी वरलीया सोंगा !

होय, खरे आहे ते !

चोखोबांची जात महत्त्वाची नाही. त्यांचा भाव वेडावाकडा नाही. हे मी अनुभवलेच.

नामदेवांचे तर ते शिष्य.

आपल्या शिष्याची समाधी स्वतःच्या हाताने बांधण्याचा हा दुसरा प्रसंग !

एक आळंदीत घडला,

दुसरा पंढरीत !

शिष्याच्या समाधीसमोर गुरूने समाधी घेतल्याचे मात्र हे एकच ठिकाण !

माझ्यापायाशी नामदेव तर समोर त्यांचे शिष्य चोखोबा !

एकमेकाकडे पहात पांडुरंगाच्या दर्शनाला येणाऱ्या भक्ताची पायधूळ मिरवीत दोघेही म्हणत असतात–

पांडुरंग हरी, वासुदेव हरी ! आणि मी या गुरुशिष्यांची अलौकिक जवळीक नित्य पहात, निरखीत स्वतःला धन्य मानत, त्याचे भूषण मिरवीत कृतार्थपणे शतकानुशतके उभा आहे अखंडपणे म्हणत–

ऊंस डोंगा परी ... ...

आम्ही वारिक वारिक

सेना :

भक्त कबीर हिंदू की मुसलमान असा त्यांच्या शिष्यामध्ये त्यांचे निधन झाल्यावर तंटा माजला.

स्वामी रामानंदांचे ते शिष्य असल्याने ते हिंदूच आहेत असा त्यांच्या हिंदू शिष्यांचा आग्रह होता. तर त्यांचे मुसलमान शिष्य म्हणत त्यांचे पालनपोषण एका मुसलमान विणकऱ्याने केले असल्याने ते मुसलमानच आहेत. आणि एवढेच नव्हे तर ते मुसलमानाना पीर वाटतात.

कबीर जिवंत असतानासुद्धा असाच प्रश्न एका वल्लीने त्यांना केला असता कबीर उद्गारले होते–

साधू ऐसा चाहिए जैसा सूप सुभाय
सार सार को गहीं रहे थोता देत उडाय ।

साधू हा जेवढे चांगले तेवढे घेऊन फोलपट उडवून लावणाऱ्या सुपासारखा पाहिजे.

कबीरानी या एका दोह्यातून दोघाना निरुत्तर करून टाकलं होतं. पुन: ऐके ठिकाणीं असं म्हटलं की ज्याप्रमाणे युद्धामध्ये तलवार महत्त्वाची, म्यान नव्हे, अगदी तसेच साधूसंदर्भात आहे. साधू कोणत्या जातीचा आहे हे महत्त्वाचे नसून त्याचे ज्ञान महत्त्वाचे असते. या दोन दोह्यांचा अर्थ निराळ्या स्वरुपात कबिरांचे गुरुबंधू संत सेना यांच्या संदर्भात लागू पडतो.

कबीरांचा जन्म कुठला, त्यांची जात कोणती हे इतिहास स्पष्टपणे सांगू शकला नाही. अगदी तसेच संत सेना यांच्या विषयी ठामपणे सांगणे अवघड आहे.

संत चोखोबा म्हणतात, 'काय भुललासी वरलीयां सोंगा ।' तसाच प्रकार बहुतेक संतांच्या बाबतीत आहे. नाहीपेक्षा महंमदाना त्रास झाला नसता. ते केवळ मुसलमान म्हणून त्याना पंढरीरायापासून दूर ठेवले गेले यावर शेख महंमद कळवळून पण तेवढ्याच आत्मविश्वासाने म्हणत

ऐसे केले या गोपाळे
नाही सोवळे ओवळे
... ...
शेख महंमद अविंध
त्याचे हृदयी गोविंद

' लोकांनी सोवळे ओवळे निर्माण केले आणि काहीना दूर ठेवले, पण या पांडुरंगाजवळ असले सोवळे ओवळे नाही. ... शेख महंमद मुसलमान असला म्हणून काय झाले? त्याचे हृदयात गोविंद आहे.'

शेख महंमद काय अथवा चोखोबा काय किंवा कबीर काय त्यांची भक्ती महत्त्वाची. ही भक्ती त्यांना महात्पदास नेऊन त्यांचे मोठेपण सिद्ध करून गेली.

व कबीराचे गुरुबंधु. रामानंद स्वामींचे जे काही शिष्य होते त्यातील एक सेना असेच भासतात

त्यांचा जन्मकाल साधारणतः माघ पौर्णिमा शके १२६५ असे काही पंजाबी अनुयायी मानतात आणि पंजाबातील अमृतसर जिल्ह्यातील सोहलहट्टी या गावात ते जन्मल्याने पंजाबचे सुपुत्र आहेत असा दावा मांडतात. अधिक माहिती सांगा म्हणताच म्हणतात आईचे नाव जीवनदेवी आणि वडिलांचे मुकुंदराय व आत्याचे नाव सोमी. ते बरेच दिवस या आत्याकडेच राहिले. एवढेच नव्हे तर आज त्यांचे वंशज दाखवता येतील. 'पण हे खोटे आहे असे राजेस्थानी म्हणतात. व कशाला विवाद करता ?' असे म्हणून, संत सेना महाराजांचा राजस्थानी भाषेतील ही रचना पहा म्हणतात

' सेन जो ऐसीर खिजमत कीजे
जिद मारो श्याम पतीजे
रेणी राचोडी करीती रीं
लैंचा समज समज खडीजे
मन कटोरी रवन्या जलभीतर
सत को पलीजी डलाजें ' ......

सेवा अशी करावी की प्रभू श्याम गहिंवरावा. श्मश्रू सुंदर करावी, कात्री मधून मधून वापरावी. मनरूपी वाटीमध्ये सत्यरूपी जलात गुरुज्ञानरूपी साबण मिसळावा.. '

पण खरं तर, सेना पंजाबी, राजस्थानी की अन्य प्रदेशी हा प्रश्न महत्त्वाचा नाही, महत्त्वाची आहे त्याची भक्ती !

त्यांची भक्ती महत्त्वाची हे खरे आहे. पण पंजाब, राजस्थान उत्तर-प्रदेश, महाराष्ट्र येथील त्यांचे अनुयायी त्यांना आपल्या प्रदेशाचे मानतात यातच त्यांचे मोठेपण सामावले आहे.

शिखांच्या ग्रंथ साहेबात त्यांचे एक गीत समाविष्ट आहे. त्यांची हिंदी रचना उपलब्ध आहे, त्यामुळे ते उत्तर भारतीय असावेत असा संशय व्यक्त केला जातो. पण त्यांचा जन्म मध्य प्रदेशातील बांधवगड

येथे झाल्याचे आज रूढ मानले जाते. ग्रंथसाहेबात असणाऱ्या पदामध्य गुरू रामानंद महाराजांचा उल्लेख येत असल्याने त्यांचा जन्मकाल अनिश्चित ठरतो.

सेना महाराजांचा जन्म बांधवगड येथे झाला की सोहलहट्टी हा प्रश्न किंवा शके १२६५ की आणखी कधी म्हणजे वैशाख वद्य १२ शके १३५७ हा प्रश्न महत्त्वाचा नाही महत्त्वाचे आहे ते त्यांचे वर्तन. ! त्यांची भक्ती कशी होती हे महत्त्वाचे. आपण सारे संसारी ! आपली भक्ती अत्यंत तोकडी. भक्ती कशाला म्हणायची ? असा प्रश्न केला तर महर्षी नारद सांगून गेले आहेत, ' सा अनुरक्तिः ईश्वरे ! ' आपली तशी अनुरक्ती असते का? स्वतः ' सेना ' महाराज म्हणतात—

करसी खटपटी । पोटासाठी आटा आटी ॥
नाम घेता विठोबाचे । काय तुझ्या ' बा ' चे वेचे ॥
धनाचिया आशा । वाडगीं फिरशो दाही दिशा ॥
जावे हरी कीर्तना । नावडे तुझ्या मना ॥
सेना म्हणे ऐशा नरा । जवळूनी दूर करा ॥

आपण सारी फाजील स्वार्थी माणसे ! अशा स्वार्थी माणसांना दूर केलेच पाहिजे. आपल्याला काय माहित ?

नाम घेता विठोबाचे । नाही भय कळीकाळाचे ॥
सांगीतले संत जनी । बोले वेदशास्त्र वाणी ॥
पहा गणिका तारिली । नामे वैकुंठासी नेली ॥
पूतना राक्षसी । सायुज्यता देणे तिसी ॥
भावभक्तींचा अंकित । सेना म्हणे पंढरीनाथ ॥

पंढरीनाथ भक्तीचा अंकित असतो हे जगजाहीर आहे. त्याने जनाबाईचे दळण दळावे, श्रीखंड्या बनून नाथासाठी गंध उगाळून दिले, कबीराचे शेले विणले. त्यानं काय काय केलं नाही ? प्रत्यक्ष हातात वस्तरा घेऊन आपल्या भक्तासाठी केसकर्तन सुद्धा केलं. ।

त्याचं असं झालं–

सेना महाराज हे बांधवगड नावाच्या राजधानी असलेल्या राज्याचा जो स्वामी रामराजा त्याचे आश्रित सेना संस्थानात असणारा हा दुर्ग तसा बोधगढ म्हणूनसुद्धा ओळखतात. हा रामराजा तसा प्रजाहितदक्ष होता. हे राज्य ईश्वराने प्रजेच्या कल्याणासाठी सोपविले आहे अशी त्याची धारणा होती. याच्या पदरी देवीदास म्हणून एक नहावी होता. हा आपल्या धन्याची सेवा फार काळजीपूर्वक आणि निर्मळ मनाने करी. या देवीदासाचा मुलगा म्हणजेच सेना. सेना अत्यंत देखणा होता. दुधाप्रमाणे त्याचा गौरवर्ण पाहून या रामराजाने देवीदासाच्या मुलाचे नाव ' सेना ' असे ठेवले. हा पुढे आपल्या वडिलाप्रमाणेच रामराजाची सेवा करु लागला.

लहानपणापासून घरी ईश्वरभक्ती संदर्भात चर्चा असे त्यामुळे 'सेना' व तसे संस्कार झालेले । फावला वेळ तो ईश्वरचिंतनात खर्च करी.

एकदा कीर्तनकार आला की त्यांचे कीर्तन ऐकावे. त्याची नक्कल करावी हा याचा छंद. परिणामस्वरुपी याला साधुसंताबद्दल प्रेम निर्माण होई. आईबापांच्या अनुपस्थितीत कोणी साधूसंत आला तरी तो त्यांना आपल्या घरी आणी. त्यांच्याशी गुजगोष्टी करी.

रामानंद असेच फिरत फिरत बांधवगडास आले असता त्याना याने आपल्या घरी नेले आणि आपल्या सेवेने संतुष्ट करून त्यांचे शिष्यत्व मिळविले रामानंदाच्या बारा शिष्यामध्ये सेनाचे स्थान दुसरे होते यातच त्यांचे मोठेपण दिसून येते.

रामानंदाच्या शिकवणुकीचा त्यांच्यावर फार मोठा प्रभाव पडला असे मानले तरी एक गोष्ट महत्त्वाची आहे. त्यांची पंढरीनाथावर फार मोठी भक्ती होती.

रामानंद स्वामींच्या उपदेशाने सेनाजीमध्ये एक फरक पडला. त्यांचा उरला सुरला वेळ ईशचिंतनात जाऊ लागला.

यथावकाश त्यांचा विवाह झाला. सेनाजी संसारात गुंतले नाहीत, संसार चिखलाप्रमाणे असतो, त्यात जेवढे रुतावे तेवढे आपण अधिक फसत जातो. त्या चिखलातून केव्हातरी एकादे कमळ उगवते. सेनाजी असे कमळाप्रमाणे होते. संसारात राहून संसारात नसल्यासारखे भासत.

प्रात:काळी उठून ईशस्मरण करीत आपले काम करावे स्नान करून देवपूजा करावी आणि राजदरबारी सेवेसाठी उपस्थित व्हावे असा त्यांचा सर्वसाधारण परिपाठ असे.

राजसेवा संपली की राजासमवेत परमेश्वरासंबंधी काही गुजगोष्टी कराव्यात. निवांतपणे घरी यावे. काही अन्य कामे असल्यास करावीत, उरला वेळ पुन: ईशचिंतनात खर्च करावा असा त्यांचा दिनक्रम असे.

एके दिवशी ते नेहमीप्रमाणे स्नान करून देवपूजेस बसले असता त्यांची भावसमाधी लागली आणि किती वेळ सरला याचे त्यांना भान उरले नाही, भान राहिले नाही. राजसेवेची वेळ सरत आली. तरी यांची भावसमाधी उतरेना. त्यांची पत्नी त्यांना भावसमाधीमधून जागे करू इच्छित नव्हती. बिचाऱ्या पत्नीस काय करावे हे सुचेना. भावसमाधी मोडावी तर ईशप्राप्तीच्या मार्गांत अडथळा आणल्यासारखे होणार आणि तसे केले नाही तर राजाची गैरमर्जी होणार अशी तिची दोलायमान अवस्था झाली. शेवटी तिने निर्णय घेतला. भावसमाधी मोडायची नाही. राजाची मर्जी खपा झाली तरी चालेल. हा निर्णय तिने घेतला आणि राजाकडून बोलावणे आले. राजसेवकाला तिने सेनाजी देवपूजा करताहेत ती पूजा संपली की येतील असा निरोप दिला राजसेवक निघून गेला. बराच वेळ गेला तरी राजाकडे सेनाजी जाऊ शकले नाहीत कारण ते भावसमाधीतून जागे होऊ शकले नव्हते. भक्तावर असा दुर्धर प्रसंग आला आहे असे प्रभूला जाणवताच त्यांनी सेनाजीचे रूप धारण

केले आणि ते गळचात धोकटी अडकवून राजप्रासादाकडे निघाले. इकडे रामराजा सेनाजी न आल्यामुळे अस्वस्थ होता. राजाने पुन: निरोप पाठवायचा असा विचार केला तेवढचात सेनाजी रूपाने प्रत्यक्ष प्रभूनी राजप्रासादात प्रवेश केला.

राजा तसा उशीर झाल्यामुळे मनातून चिडला होताच. सेनाजीला खरमरीत बोलून त्याचा समाचार घ्यायचा असा त्याचा विचार असतानाच सेनाजीचे ते नित्य परिचयाचे रूप पाहून राजाला काय बोलावे हे सुचले नाही.

प्रभूने आपल्या आगमनाने प्रारंभीच राजाच्या मनातील क्रोध संपविला. ते सेनाजीचे सावळे रूप राजप्रासादात येताच जिकडे तिकडे एक अगम्य सुगंध पसरून राहिला. सेनाजींच्या दर्शनाने बहुतेकाना मन:शांती लाभली.

राजाची सेवा करता करता सेनाजीनी राजाच्या मस्तकावर हात ठेवला. आणि काय घडते आहे याचा राजाला विसर पडला. राजाची कुंडलिनी जागृत झाली. तो कुंकुमात न्हाऊन निघालेल्या नागिणीच्या पिलाप्रमाणे वळवळू लागला. आणि सहाही चक्रांचे पदर फुटून इडा पिंगळा एकवटल्याचा त्याला भास झाला. नाकामध्ये परिमळ रेंगाळला, डोळचाने अद्‌भूत अवलोकिले, कर्णानी नादब्रह्म श्रवण केले, त्वचेवर रोमांच उभे राहिले, वाणी अवाक् झाली आणि ती प्रणवाचा जप करू लागली. त्याक्षणी असणारी अवस्था संपूच नये असे रामराजाला वाटले. सेनाजी एवढचा तन्मयतेने कधी सेवा करीत असावा काय असा संभ्रम निर्माण झाला नाही.

डोकीस लावण्यासाठी नेहमी सुगंधी तेल असेच पण सेनाजीने त्या वाटीला स्पर्श करताच त्या सुगंधाचा परिमळ अधिक वाढला. राजाने त्या वाटीत डोकावले मात्र त्याला रोज ज्या सेनाजीचे रूप दिसत असे त्या ऐवजी मोरपिसानी युक्त असणाऱ्या श्रीकृष्णाचे रूप दिसू

लागले. परात्म्याचे ते हसरे रूप पाहून राजा परम संतोषला त्या तेलाच्या वाटीत दिसणाऱ्या त्या रूपाकडे पहातच राहिला. तेल चोळणे संपले. राजाला त्या दिवशी हलके हलके वाटू लागले. मोरपिसाचा स्पर्श साऱ्या अंगाला जाणवत होता. आणि ही अवस्था कधी संपूच नये असं त्याला वाटत होतं

पण कुठंतरी थांबणं भाग होतं. सेनाजींनी वाटी तिथेच ठेवली. त्याने अहंकाराची शेंडी पिरंगाळली होती. राजाला विवेकाच्या आरशात त्याचे खरे रुप दाखवून दिले होते. आणि निरोप मागितला होता.

राजा प्रसन्न झाला होता. त्याने मूठभर सुवर्णनाणी सेनाजींच्या धोकटीत टाकली. सेनाजींनी ती घेऊन प्रस्थान ठेवले. सेनाजीच्या घरी येऊन प्रभूंनी ती सुवर्णनाणी असणारी धोकटी खुंटीस अडकवली आणि ते अंतर्धान पावले. इकडे सेना आपल्या भावसमाधीतून जागे झाले. घरामधील प्रसन्न वातावरणाने ते भारुन गेले. त्या भारलेल्या वातावरणाने मुग्ध झालेले सेना तंद्रीत असताना त्यांच्या पत्नीने राजसेवा करण्यासंबंधी त्याना आठवण करून दिली. सेनानी धोकटी गळयात अडकवली आणि ते राजप्रासादाकडे निघाले.

राजसेवा करण्यास उशीर झाला असल्याची बोंच त्यांना लागली. आणि ते झपाझप पावले उचलीत राजप्रासादात येऊन पोहोचले.

प्रभू सेनाजी धोकटी उचलून राजप्रासाद सोडीपर्यंत रामराजाला तेलाच्या वाटीत श्रीकृष्णाचे साजिरे रूप दिसत होते. सेना केव्हा निघून गेले याचे भानही राजाला उरले नव्हते वारंवार राजा वाटीतील ते मनोहर रूप न्याहळीत बसला होता प्रभू सेनाजी अंतर्धान पावले आणि त्या वाटीतील ते रूप नाहीसे झाले. राजाला त्या वाटीत रूप न्याहाळण्याचा छंदच लागला.

वाटीतील रूप नाहीसे झाल्याचे पाहून राजा स्नानास उठला स्नान आटोपून राजा दरबारात येऊन बसला. आज काय घडत आहे

याचा त्याला तर्क करता येईना. सातत्याने त्याच्या डोळ्यापुढे तेलाच्या वाटीतील ते हसरे रूप उभे राहू लागले.

त्या अवस्थेत असतानाच सेनाने प्रासादात प्रवेश केला. घाई-घाईने प्रवेश करणाऱ्या सेनाला पाहताच सेवक म्हणाला ' राजे राजसभेत गेले सुद्धा. '

सेना बुचकळ्यात पडला आपल्या हातून अक्षम्य अपराध घडला या जाणिवेने त्याने खाली मान घालूनच राजसभेत प्रवेश केला. सेना आल्याची वर्दी राजाला मिळताच राजा एकदम आश्चर्यचकित झाला तसाच आनंदला.

खालच्या मानेने सेनाने राजसभेत प्रवेश करताच राजा एकदम उठून उभा रहात म्हणाला, ' सेना आम्हाला मघाचे ते सुंदर सावळे रूप पुन्हा दाखव '

सेना म्हणत होते, ' महाराज मी कसले रूप दाखवणार ? मी आत्ताच येतोय ! आपणास काही तरी भूल पडली असेल. मला कसले रूप दाखविता येणार ?'

यावर राजाने त्याला सर्व वृत्तांत सांगितला. आणि म्हटले, ' पुनः सुवर्णमुद्रा हव्या असतील तर तसे सांग. पण ते रूपमनोहर बिंब दाखवच. '

सेना यावर काय बोलणार ? त्याने काकुळतीला येऊन सांगितले तरी राजाचा त्याच्यावर विश्वास बसेना. शेवटी राजाने सांगताच सेनाने आपल्या धोकटीत हात घातला आणि त्याला त्या धोकटीत सुवर्णमुद्रा आढळल्या.

काय घडले असेल याचा सेनाला अंदाज आला आणि ते म्हणू लागले-

> शुद्ध नाही माझी याती ।
> नाही केली हरी भक्ती ॥

शिणविला हा कमलापती ।
बाबली नाही अंगी विरक्ती ॥
नाही अपराधा या गणीत ।
देखोनी होन ब्राह्मणा देत ॥
देवासी मी घालो संकटात ।
विठोबाची मी आण वहात ॥
सेना म्हणे अरे ऋषीकेशी ।
मजकारणे उगा शिणलासी ॥

सेनाने राजाला सारी हकीकत सांगितली अन् ते म्हणाले ' महाराज ज्याच्या दर्शनासाठी सारी संतमंडळी अहोरात्र त्याचे चिंतन करतात त्या महान परब्रह्मप्रभूचे दर्शन तुम्हाला घडले एवढेच नव्हे तर त्याने तुमची सेवासुद्धा केली यापेक्षा आणखी काय हवे ? खरोखरच तुम्ही धन्य आहात. परब्रह्म प्रभूने माझे रूप धारण केले यातच मला सारे मिळाले. आता पुन: दुसरे काही मागणे नाही. मला आपल्या सेवेतून मुक्त केलेत तर अत्यंत ऋणी होईन. ' सारी राजसभा अवाक् झाली. ज्याला आपण सेना न्हावी म्हणून त्याची प्रसंगी टवाळी करतो. तो परमेश्वराचा महान भक्त असल्याची कल्पना साऱ्याना आली आणि ज्याला त्याला अपराध्यासारखे झाले.

संसाराचा त्याग करण्याची भावना सेनाच्या मनांत उद्‌भवली असावी अशी शंका राजाला वाटून गेली. प्रत्यक्ष परमेश्वराला सेना बनून यावेसे वाटते म्हणजे सेना हा सामान्य व्यक्ती नव्हे याची जाण राजाला तत्काळ आली. आणि त्याने सेनाला आपल्या सेवेतून मुक्त तर केलेच उलट त्याना आपल्या गुरूस्थानी मानले. एकदा असा सेवामुक्तीचा आनंद मिळताच सेना ईशभक्तीत रममाण होऊ लागले आणि म्हणू लागले–

समचरण त्या विटेवरी ।
पाहता समाधान अंतरी ॥

चला जाऊं पढरीसी ।
भेटू रखुमाई वरासी ॥
होतीं संताचिया भेटी ।
सांगू सुखाचिया गोष्टी ॥
जन्ममरणाची चिंता ।
सेना म्हणे नाही आता ॥

एकदा अशी चिंता मिटल्यावर मग त्यांना वाटूं लागले.

ब्रह्मादिक पडती पाया । जे शरण पढरीराया ॥
मोक्ष मुक्ती लोटांगणी । उभ्या तिष्टती अंगणी ॥
सूर्यसुत शरणांगत । येऊनी चरणी लागत ॥
काया मने वाचा । सेना शरण विठोबाचा ॥

एकदा ते असे पंढरीनाथास शरण गेल्याने त्यांची पंढरीची वारी सुरूं झाली. पंढरीला निघताना ते सर्वांना सांगत–

जाता पंढरीस । सुख वाटे जीवा ।
आनंदे केशवा । भेटताची ॥
या सुखाची उपमा । नाहीं त्रिभूवनी ।
पाहिलीं शोधोनी । अवघी तीर्थे ॥
ऐसा नाम घोष । ऐसे पताकांचे भार ।
ऐसे वैश्णव डिंगर । दावा कोठे ?
ऐसी चंद्रभागा । ऐसा पुंडलीक ।
ऐसा विष्णुनादी । काला दावा ॥

ते पुढे म्हणत–

ऐसा विटेवरी । उभा कटेवरी कर ॥
ऐसे पाहता निर्धार । नाही कोठे ॥
सेना म्हणे खूप । सांगितली संती ॥
यापरती विश्रांती । न मिळे जीवा ॥

सेना पंढरीस आले की त्यांच्या मनाला खूप विश्रांती मिळे. याचं कारण असं की–

आजि फळा आले पुण्य गेले भेदोनी गगन ।
संत झालेती कृपाळ माझा केलाजी संभाळ ।
संचित ते ओळले तुमची देखली पाउले ।
सेना म्हणेजी नेणे कृपा केली नारायणे ।

असे त्याना वाटू लागे.

एकदा नारायणाने कृपा केली की–

हारपले दुजेपण फिटला संदेह ।
निमाली वासना गेला देहभाव ॥
विटेवरी उभा पंढरीचा राणा ।
सेना म्हणे हा आवडतो मना ॥

पंढरीनाथाच्या दर्शनाने संसारा संबंधीची ओढ निमाली तरी लौकिकासाठी सेना संसारात गुंतल्यासारखे भासत. प्रत्यक्षांत ते ज्ञानेश्वर, निवृत्तीनाथ यांच्या संगतीत राहण्यांत आनंद मानीत ते म्हणायचे–

संत दर्शनाचा लाभ हा मनासी । उल्हास चित्तासी होत राहे ॥
झाला वरहस्त उपजलें ज्ञान । गेले ते अज्ञान पळून हो ॥
राव आणि रंक मानती समान । देही समाधान करूनी वागे ॥
सेना म्हणे अवतार तो संतामधी होईल सद्‌बुद्धी यांच्या नावे ॥

या चार भावंडाबद्दल सेनाजीना अपार श्रद्धा. पण त्यांच्या निर्वाणामुळे त्यांना अपार दुःख झाले. त्या वेदनेतून त्यांच्या मनी विचार उठू लागले–

संतीं सांगितले ते म्या हृदयी धरिले ।
अंगिकार केला भार चालवी विठ्ठला ।
तारिला अजामीळ महापापी की चांडाळ ।
पतीत पावन करीं नाम हे जतन ।
वागवीं अभिमान सेना न्हावी यातीहीन ।

पंढरीनाथाला आळवीत सेना आता यातीहीन झाले होते. त्याना एकच माहीत होते

विटेवरी उभा जैसा लावण्याचा गाभा ।
पायी ठेउनिया माथा अवघी वारितसे चिंता ।
समाधान चित्ता डोळा श्रीमुख पहाता ।
बहु जन्मी केला लाग सेना देखें पांडुरंग ।।

पांडुरंगाला पाहिले की त्यांचे मन आनंदाने भरून येई ते सर्वांना सांगत-

घेता नाम विठोबाचे पर्वत जळती पापांचे ।
ऐसा नामाचा महिमा वेद सिपला झाली सीमा ।
नामे तारिले अपार महा पापी दुराचार ।
वाल्हा कोळी ब्रह्महत्यारी नामे तारिला निर्धारी ।
सेना बैसला निवांत विठ्ठल नाम उच्चारीत ।

विठ्ठल नाम उच्चारीत ते पंढरीची वारी करूं लागले. पण आपला व्यवसाय ते विसरले नांहीत. त्यांनी प्रत्यक्ष हाती वस्तरा धरला नाही पण त्यांचे विचार धारदार असायचे ते म्हणत–

आम्ही वारिक वारिक । करू इजामत बारिक ।
विवेक दर्पण आयना दावूं । वैराग्य चिमटा हालवूं ।
उदक शांती डोई चोळूं । अहंकाराची शेंडी पिळू ।
भावार्थाच्या बगला झाडू । काम क्रोध नखे काढू ।
चौ वर्णा देउन हात । सेना राहिला निवांत ।।

होय, या चारी वर्णाला अध्यात्माचा हात देऊन सेना निवांत होत गेले. दिवस होता श्रावण वद्य द्वादशीचा ! सेना निवांत होत होत म्हणत होते

संती सांगितले तेचि तुम्हा निवेदिले ।
मी तो सांगतसे निके येतील रागे येवो सुखे ।
निरोप हा सांगता कासया वागवावी चिंता ।
सेना आहे शरणागत विठोबा रायाचा दूत ।।

विठोबा रायाचा हा दूत असं सांगून गेला खरा. पण तो कुणाचा हा वाद राहतोच. पंजाबी म्हणतात आमचा, राजस्थानी म्हणतात आमचा, उत्तरप्रदेशी म्हणतात आमचा, तर मराठीमध्ये जेवढी रचना आहे तेवढी इतर भाषेत नसल्याने महाराष्ट्र म्हणतो आमचा मग सेना खरे कोण ? न पंजाबी, न राजस्थानी, न महाराष्ट्री ! ते वारी करणारे वारिक !

' वळचणीचे पाणी आढ्या गेले रे ! '

संत निवृत्तीनाथ

नासिकपासून जवळ असणाऱ्या त्र्यंबकेश्वर नावाच्या गावात बारा ज्योतिर्लिंगापैकी एक सुप्रसिद्ध ज्योतिर्लिंग आहे. या त्र्यंबकेश्वराजवळच त्याच्या पश्चिमेस ब्रह्मगिरी म्हणून एक महान सिद्धभूमी आहे. या गिरीवरच गोदावरीचा उगम झाला आहे. या गोदावरीमुळेच हा परिसर पवित्र झालाय.

या दक्षिणगंगा गोदावरीने माझी निर्मिती होण्यास सहाय्य केले आहे. या गोदावरीला 'कुश' नावाच्या दर्भांनी वेढून टाकून तिला क्षणभर बंदिस्त केल्याचा परिणाम म्हणून एक तीर्थ निर्माण झाले. कुशाने आवर्त केलेले म्हणून 'कुशावर्त' असं माझं नाव पडलं.

त्या काळापासून मला 'कुशावर्त' तीर्थ म्हणून ओळखतात.

माझ्या पश्चिम दिशेस असणाऱ्या पर्वतराशीस ब्रह्मगिरी म्हणून संबोधतात, त्याला कारणही तसेच प्रबल आहे. याच ब्रह्मगिरीच्या कुशीत किती ब्रह्मजिज्ञासूनी चिंतन केले, किती मुमुक्षूनी ईप्सित साध्य करून घेण्याचे प्रयत्न करून सिद्धी मिळवली, याला गणती नाही.

याच ब्रह्मगिरीवर दक्षिणगंगा गोदावरीने जन्म घेतला. जन्म घेऊन ती दहा-पंधरा पावले चालली आणि अचानक गुप्त झाली ती पुन: ब्रह्मगिरीच्या मध्यावर प्रकट झाली. आज त्या स्थानाला गंगाद्वार म्हणून ओळखतात.

तेथून वहात ती पुढे त्र्यंबकेश्वरी आली. त्र्यंबकेश्वरास पावित्र्य देऊन की त्र्यंबकेश्वराच्या पदस्पर्शाने पावन होऊन ती प्रवाहित झाली हा प्रश्न बाजूस सारता येईल.

मात्र ब्रह्मगिरी, गंगाद्वार, कुशावर्त आणि त्याचे त्र्यंबकेश्वर असा चौकोन प्रसिद्धीस आला. त्याला कैक शतके लोटून गेली. शतके संपतात पण त्यांच्या कहाण्या दक्षिण गंगेप्रमाणे एका पिढीपासून दुसऱ्या पिढीकडे वहातच रहातात. हा चौकोन तसा अपुरा वाटे.

आज हा अपुरा चौकोन संपला आहे आणि त्याचे रुपांतर पंचकोनात झाले आहे. ब्रह्मगिरी, गंगाद्वार, कुशावर्त, त्र्यंबकेश्वर आणि निवृत्ती समाधी अशी या पंचकोनाची पाच अंगे होत. आपल्या भारतीय तत्त्वज्ञानानुसार पंचीकरणाचे हे निराळे रूपच म्हणाना ! यातला ब्रह्मगिरी म्हणजे पृथ्वीतत्त्व. कुशावर्त म्हणजे आपतत्त्व, गंगाद्वार म्हणजे तेज-तत्त्व, त्र्यंबकेश्वर म्हणजे वायु-तत्त्व, तर निवृत्ती समाधी म्हणजे आकाश-तत्त्व !

ब्रह्मगिरीमुळे गंगा जन्मली म्हणून ते पृथ्वीतत्त्व, तर कुशावर्तात केवळ सर्व तीर्थांचे जल म्हणून ते आप-तत्त्व आणि ब्रह्मगिरीत गुप्त झालेली गंगा शंकरानी आपल्या तेजाने पाताळातून वर खेचली म्हणून ते गंगाद्वार म्हणजे तेज-तत्त्व तसेच त्र्यंबकेश्वरामध्ये सर्व तत्त्वांचा म्हणजे उत्पत्ती, स्थिती आणि लय या तिघांचा समन्वय साधण्याचे सामर्थ्य म्हणून ते वायुतत्त्व, तर निवृत्तीनाथानी एवढे आघात सोसले की त्याला सीमा नाही, असे हे निवृत्तीनाथ म्हणजे विशाल हृदयी गुरु तसेच बंधू आणि पोषणकर्ते ! आकाशासारखे

साहणारे, सामावून घेणारे दुसरे कोणते तत्त्व आहे ? म्हणून ते स्थान म्हणजे आकाशतत्त्व ! असे हे पंचीकरणाचे स्वरूप असणारे, आणि स्वरूप जोपासणारे स्थान !

मला हे असं आपलं उगीच वाटतं असं नव्हे, 'त्र्यंबकेश्वर' या पांच तत्त्वांचं प्रतीक आहे. ब्रह्मगिरी याला साक्षी आहेच.

माझी निर्मिती झाली आणि शतकं संपू लागली. यात्री, कापडी, साधू, संत या निवांत परिसरात येत. ध्यानमग्न होत आणि जीवनातला श्रेष्ठ आनंद लुटत.

माझ्या शरीराला किती किती श्रेष्ठांच्या धुळीनं पावित्र्य आणून दिलंय याची गणती नाही.

निवृत्तीनाथ इथे आले ते दोन वेळा !

प्रारंभी आपल्या कुटुंबियासमवेत बालवयात !

तर अंती एकाकी, साऱ्याना निरोप देऊन !!

दोन प्रसंग पण अगदी परस्पर टोकाचे !

मला त्यांच्या स्वतःच्या, त्यांच्या मायपित्यांच्या, त्यांच्या भावंडांची चरणधूळ धारण केल्याचा आनंद दिलाय त्यांनी.

हे निवृत्तीनाथ, नाथ झाले नव्हते अजून. पण त्यांचा नाथ संप्रदायाशी संपर्क होता. त्यांचे मूळ पुरुष भक्त त्र्यंबकपंत. मुक्ताई म्हणते–

भक्त त्र्यंबकपंत मूळ पुरुष आधी ।
त्यांची समाधी आपेगांवी ॥

आपेगावच्या या त्र्यंबकपंतांच्या वडिलांचे नाव गोपाळ, तर आजोबांचे रामचंद्र आणि पणजोबांचे हरिहर. एकापेक्षा एक वरचढ असणारे हे सारे सद्वर्तनी आणि सालस होते.

त्र्यंबकपंतानी उतारवयात आपल्या कुलाचाराप्रमाणे वानप्रस्थाश्रम संपवून संन्यास घेतला आणि सारा कारभार गोविंदरावाकडे सोपवला. ही सारी पूर्वज मंडळी नेहमी तशी ब्रह्मानंदात मग्न असणारी असली पाहिजेत. प्रत्येकाने नाथ संप्रदायाशी आपला संपर्क ठेवलेला असला पाहिजे, न पेक्षा गोविंदरावांचा गहिनीनाथाशी घरोबा असल्याविना एवढी जवळीक साधलीच नसती गोविंदरावांच्या पत्नी पूर्वाश्रमीच्या देवकुळे घराण्यांतील नीराबाई होत. लोक नेहमी म्हणायचे,

गोविंदा विश्रांती गैनीनाथ

तर

नीराबाई प्रेम गैनीनाथी

गहिनीनाथांची कृपा या घराण्यावर निश्चितच असली पाहिजे, यात संशय नाही.

या गोविंद नीराबाई दांपत्याला उतारवयात एक मुलगा झाला. विठ्ठल असं त्याचं नाव ठेवलं गेलं. मुलगा उतारवयात झाला म्हणून त्याच्याकडे दुर्लक्ष झालं नाही. त्याला त्याकाळी आवश्यक असणारे शिक्षण मिळालं. म्हणून तर म्हटले जाते—

केले वेदपठण, काव्य आणि व्याकरण
जालासे निपुण शास्त्र-वक्ता

विठ्ठलपन्त शास्त्रामध्ये निपुण झाल्याने तीर्थयात्रेला निघाले तीर्थयात्रा करीत ते द्वारावती, पिंडारक, सुदामपुरी, प्रभास, सोमनाथ, धवलपूर करीत माझ्याजवळ आले. माझ्या जलामध्ये स्नान करून ते गंगाद्वाराकडे वळले. गंगाद्वारी थांबून ब्रह्मगिरीला उजवी घालून विठ्ठलपन्त भीमा-शंकरास आले. ही तीर्थक्षेत्रे पहात असता त्यामध्ये वास्तव्य करीत असता मनामध्ये असणारा निवृत्तभाव हळूहळू वाढत होता. या निवृत्तभावामध्येच मग्न असता ते इंद्रायणी

नदीत स्नान करून सिद्धेश्वर दर्शनास आले, अलंकापुरीचा तो सिद्धेश्वर सुखावला.

या अलंकापुरीत दोन सिद्धेश्वर होते. पहिला अनादि सिद्धेश्वर म्हणून सर्वांना परिचित होता. साधुसंतांना ज्ञात होता तर या अलंकापुरीचे वैभव असणाऱ्या या सिद्धेश्वराचे नाव एका कुटुंबवत्सल माणसाने आपल्या लाडक्या पुत्राचे ठेऊन दुसऱ्यास परिचित केले होते,

एक अनादी असंसारी सिद्धेश्वर,

दुसरा संसारी सिद्धेश्वर.

या सिद्धेश्वराला गावातील लोक सिद्धोपन्त म्हणून हाक मारीत. विठ्ठलपन्ताना दोन्ही सिद्धेश्वर भेटले. असंसारी सिद्धेश्वराने मन:शांती दिली तर संसारी सिद्धेश्वराने कन्या देऊन टाकली.

एक निवृत्तभाव जागृत करणारा तर दुसरा प्रवृत्तभाव जागृत ठेवण्यास निमित्तमात्र ठरणारा सिद्धेश्वर!

स्थान एकच, नामही एकच
पण ते प्रवृती आणि निवृती यांची क्रीडा करण्यास लावणारे

एके दिवशी इंद्रायणी नदीमधून स्नान करून आलेल्या विठ्ठलपंताविषयी सिद्धोपंतानी चौकशी केली. तेव्हा, ते म्हणाले,

> विठ्ठल हे नाम   रामेश्वरी भाव
> वृत्ती आपेगाव   गोदातिरी
> मातापिता वृद्ध   असताती तेथे
> द्वारकादि तीर्थे   करूनी आलो

तीर्थयात्रा करणाऱ्या या युवकाला पाहून सिद्धोपंत सुखावले होते. त्यांना एक उपवर कन्या होती त्यांना वाटले या तरुणाला ती दिली

तर आपला भार बराचसा हलका होईल. परंतु विठ्ठलपंतानी ते मान्य करायला हवे ना ?

योग्य संधी साधून सिद्धोपंतानी आपला मनोदय विठ्ठलपन्ताना सांगितला पण विठ्ठलपन्तानी नकार दिला. सिद्धोपंताना क्षणभर वाईट वाटले. परंतु तसा नकार देऊन पुढील वाटचाल व्हायची नव्हती. विठ्ठलपंताच्या स्वप्नांत आदिमाया आली आणि तिने त्यांना होकार देऊन विवाह करण्याची सूचना दिली.

विठ्ठलपंत सिद्धोपंताचे जामात झाले.

यथावकाश विठ्ठलपंत आणि रुक्मिणीदेवी रामेश्वराची तीर्थयात्रा करण्यासाठी बाहेर पडले. आणि यात्रा संपवून गोकर्ण, करवीर कराड, माहुली करीत आळंदीस परतले. आता त्यांना आपल्या वृद्ध मातापित्यांना भेटावे असे वाटू लागले. आपल्या पत्नीसह ते आपल्या वृद्ध मातापित्यांना भेटण्यास आपेगावी आले.

आपला मुलगा सुनेसह आलेला पाहून या दोघाना, गोविंदराव-नीराबाईना संतोष वाटला.

त्या आनंदातच त्यानी इहलोकाची यात्रा संपविली. विठ्ठलपंताना आता मागची ओढ उरली नव्हती. आपेगावी त्यांचे मन रमेना. म्हणून ते पुनः आळंदीस आले.

आळंदीस येऊन तरी काय उपयोग ? कारण—

संसाराची चिंता नाहीं विठ्ठलासी ।
अखंड वृत्तीसी समाधान ।।

अशी त्यांची उदासीन वृत्ती होती. तीर्थयात्रेचा परिणाम तसाच होता. संन्यास घेण्याची इच्छा वारंवार उफाळून येई. एके दिवशी रुक्मिणीदेवी काही तरी कामात व्यग्र असताना विठ्ठलपंतानी संन्यास

घेतो बघ म्हणून धमकाविले. रुक्मिणीदेवीनी ' जा जा ' म्हणून म्हणताच पडत्या फळाची आज्ञा घेऊन विठ्ठलपंत काशीस जाण्यास घरातून बाहेर पडले.

रुक्मिणीदेवीनी वाट पाहिली परंतु ते परत आले नाहीत. आपल्या पतीने संन्यास घेतलाय एवढेच त्यांच्या कानी आले.

विठ्ठलपंत संन्यासी झाले खरे, पण त्यांनी संन्यासी म्हणून जीवन व्यतीत करावे अशी विधिघटना नव्हती. ज्या श्रीपादस्वामीनी त्यांना संन्यासदीक्षा दिली होती त्यांना ते संसारी आहेत असे समजताच विठ्ठलपंताना आधी गृहस्थाश्रम पार पाडून मगच संन्यास घेण्यास सांगितले.

परिणामत: विठ्ठलपंत परत घरी आले आणि त्यांनी पुन: संसारी जीवनास प्रारंभ केला. एकदा संसारी नंतर संन्यासी पुन: संसारी हा प्रकार त्यावेळच्या लोकाना मानवणारा नव्हता. ते कुचाळकीचा विषय बनले. लोक हसू लागले. आणि–

हासिन्नले लोक । बरवा हा संन्यास ।
करिती उपहास । दर्शनाचा ॥

असं होऊं लागलं. त्याचा परिणाम असा झाला की,

द्विजी वाळियेले । जगी सांडियेले ।
शेषीं उपेक्षिले । आप्तवर्गी ॥

अशी अवस्था घडली.

गुरूंचा आदेश म्हटल्यानंतर संसार करणे भाग पडले. संसारात पुन: पदार्पण केल्यामुळे लोकांची सहानुभूती सरली.

लोकांची सहानुभूती सरली. उलट त्रास वाढू लागला लोकनिंदेची आग आपल्या मुलांना पोळतेय हे दिसू लागले. त्याचा परिणाम

म्हणून विठ्ठल-रुक्मिणी या दोघांनी मन:शांतीसाठी तीर्थयात्रा आरंभिली.

तीर्थयात्रेसाठी निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ता ही चार मुले घेऊन विठ्ठलपंत त्र्यंबकेश्वरी आले. निवृत्तीनाथ अशा रीतीने आमच्या या परिसरात आले.

मुलांचा दोष नसताना त्यांना त्रास होऊ नये म्हणून विठ्ठलपंतानी तीर्थयात्रा आरंभिली खरी पण विधीसंकेत निराळा असला पाहिजे.

जंगलाने वेढलेल्या व क्रूर श्वापदानी भरलेल्या या परिसरात ही चार भावंडे आणि त्यांचे माता-पिता आले की त्यांना दैवाने बोलवून घेतले हा प्रश्न पडतो. आदिमाया काय काय खेळ करील हे सांगणे अवघड हेच खरे.

त्र्यंबकेश्वराचे दर्शन घेऊन ही मंडळी गंगाद्वाराकडे निघाली आणि एक अघटित घडले.

अचानक एक वाघ या कुटुंबाच्या मागे लागला. ध्यानी-मनी नसता संकट पुढे उभे राहिले. मुक्ता आणि सोपानाला कडेवर घेऊन माता-पिता धावू लागली. ज्ञानेश्वर आणि निवृत्ती याना पळायला सांगितले आणि तिथेच घोटाळा झाला.

सात आठ वर्षांचा पोर पळून पळून किती पळणार ? आईबापासमोर त्याला वाघाने मारायचे ठरवले. विठ्ठल-रुक्मिणी यानी डोळे मिटले. परमेश्वराचा धावा केला.

विठ्ठलपंतांच्या मागे दुर्दैव हात धुवून पाठीस लागले होते. समाजाची हेटाळणी, मानसिक कुचंबणा आणि त्यात आपल्या ज्येष्ठ सुपुत्राचा नाश पाहण्याचा प्रसंग त्यांच्यावर ओढवला होता.

येणारे भोगलेच पाहिजे या न्यायाने विठ्ठलपंत सारे सहन करीत होते.

वाघ मागे लागला आहे हे पाहून निवृत्ती पुढे पुढे धावत होता. वाघ मागून पाठलाग करीत निवृत्तीला इच्छित स्थळी नेत होता.

जिवाच्या आकांताने निवृत्ती पुढे पुढे पळत होता. जवळच एक गुहा दिसली आणि क्षणाचाही विचार न करता निवृत्तीने त्या गुहेत प्रवेश केला.

त्या गुहेत वाघ शिरला तर आपणास पळतासुद्धा येणार नाही हा विचार त्या बालकाला कसा सुचणार ? त्याला आधार हवा होता.

त्या गुहेत त्याला आधार मिळेल असे वाटले यातच सारे आले. त्याला विचार करण्यास अवधी नव्हता. त्याची त्या क्षणी विचित्र अवस्था झालेली होती त्यातून त्याला मक्ती हवी होती. हा संसाररूपी तर वाघ नसेल ना ? असं आता वाटतं. निवृत्तीने त्या गुहेत प्रवेश केला आणि सारे श्रम सार्थकी लागले.

वाघ बाहेर उभा राहून शेपटी आपटत गुरगुरत होता. त्याचे कार्य संपले होते, तो निमूटपणे निघून गेला. भीतीने थरथरणाऱ्या निवृत्तीला हायसे वाटले. त्याने विश्रांतीसाठी तिथे बैठक मारली. डोळे आता काळोखाला सरावले होते. त्या काळोखात एक ' नाथ ' ध्यानमग्न बसला असल्याचे निवृत्तीला दिसले.

तो साधू आपणाकडे बघून मंदस्मित करीत असल्याचा भास निवृत्तीला झाला. खुणेनेच त्या साधूने निवृत्तीला जवळ बोलाविले अन् त्याला जवळ घेऊन त्याच्या मस्तकावर हात ठेवला.

काय घडते आहे हे समजायच्या आतच निवृत्ती आपले स्वरूप विसरून गेला. तीन दिवस त्या उन्मनी अवस्थेत राहून निवृत्ती आमूलाग्र बदलून गेला.

तो गुहेतून बाहेर येताना तो पूर्वीचा निवृत्ती राहिला नव्हता. गहिनीनाथाचा शिष्य निवृत्तीनाथ म्हणून प्रसिद्ध पावणार होता.

तो नाथ बनून बाहेर पडत होता. पाचव्या दिवशी पितापुत्रांची, मायलेकरांची भेट झाली. आणि या त्र्यंबकेश्वराने निश्वास सोडला. मी सुखावलो. माझ्या सान्निध्यात विपरीत घडू नये असे मनोमनी म्हणत होतो. माझं गाऱ्हाणं ऐकलं गेलं होतं.

निवृत्ती आपल्या मायपित्याना भेटला. सर्वांना आनंद झाला. पण हा आनंद फार काळ टिकायचा नव्हता.

विठ्ठलपंत संन्यास दीक्षा घेऊन परत गृहस्थाश्रमी आले. त्यांना मुलेबाळे झाली, त्यामुळे ते कुचाळकीचा विषय झाले.

गुरूच्या आज्ञेनुसार संसार करावा लागल्याने त्याचे परिणाम निष्पाप बालकांना भोगावे लागत आहेत हे पाहून विठ्ठलपन्ताना वेदना होत होत्या.

पैठणला जाऊन शुद्धीपत्र आणावे असे योजून ते पैठणला गेले. तिथे त्याना एकच मार्ग सांगण्यात आला. तो म्हणजे देहान्त प्रायश्चित् !

विठ्ठलपन्त मनी म्हणाले, 'आपण देहान्त प्रायश्चित् घेण्याने मुलांचे कल्याण होणार असेल तर प्रायश्चित् घ्यावे'

रुक्मिणीबाईना हा निर्णय कळताच त्या म्हणाल्या 'आपल्या पापात माझा वाटा निम्मा आहे. आपण जेवढे दोषी तेवढीच मीहि ! आपण उभयता प्रायश्चित् घेऊ. या लेकरांचा भार देवावर सोडू. जे काही करायचे ते उभयता करू'

रुक्मिणीच्या या युक्तिवादामुळे विठ्ठलपन्त शोकविव्हल झाले.

आणि हे दोघे त्यांची चार मुले गाढ झोपली असता त्यांच्या अंगावर मायेची शेवटची गोधडी घालून बाहेर पडले.

पैठणच्या ब्रह्मवृंदाना त्यांनी जे विनवणीचे पत्र लिहून या मुलांना मौजीबंधनाचा अधिकार देण्याची याचना केली होती ते पत्र सकाळी निवृत्तीच्या हाती पडले आणि त्याला काय घडले, पुढे काय घडणार याची कल्पना आली.

आदल्या रात्रीपर्यंत नाथ असणारी ही भावंडे सूर्योदयाला अनाथ झाली होती.

निवृत्ती आता एकदम प्रौढ झाला. आपल्या भावंडांची जबाबदारी त्याने स्वीकारली. कारण त्याला माहित होते–

कुळीचा कुलधर्म । अवश्य पाळावा ।
सर्वथा न करावा । अनाचार ।।

आणि म्हणून समाजाने हेटाळणी केली तरी त्याची पर्वा केली नाही उलट आपल्या भावंडाना सुख लाभावे म्हणून तो म्हणायचा ' मी प्रायश्चित घेईन, देह कर्वती घालीन. या देहाला दंडीन'

पण याचा उपयोग होणार नव्हता. आणि शेष भावंडे तरीं तसे कसे करू देतील ?

निवृत्तीनाथ असे काहीसे म्हणू लागताच ज्ञानेश्वर निर्धाराने म्हणायचे, " याचे काही कारण नाही, माय तात गेले तेव्हाच नाही का तुम्हीं म्हणालात ?

अविधी आचरण । परम दूषण ।
वेदोनारायण । बोलियेला ।। "

यावर निवृत्तीनाथ काय बोलणार ?

आणि एके दिनी निवृत्तीनाथानी ज्ञानेश्वराना आपले गुह्य देऊन टाकले, उद्बोधननाथ म्हणतात,

निवृत्ती प्रसाद । तयावरी झाला ।
मार्गशीर्ष पूर्णा । प्रमाथेसी ॥
रविशक सात । एक त्यावरी ।
शिक्षापट धरी । ज्ञाननाथ ॥

निवृत्तीने ज्ञानेश्वराना गुरुपदेश दिला आणि त्या उपदेशाने पल्लवित झालेले ज्ञानेश्वर म्हणू लागले–

योगसुखाचे सोहळे । सेवका दाविसी स्नेहाळे ।
सोहंसिद्धीचे लळे । पाळिसी तूं ।।
आधार शक्तीच्या अंकी । वाढविसी तू कौतुकीं ।
हृदय कोश पालकीं । हालविशीं पै ।।
सतरावियेचे स्तन्य देशीं । अनाहताचा हल्लरु गासी ।
समाधिबोधे निजविसी । बुझावुनी ।।
म्हणोनी साधका तू माऊली । पिके सारस्वत तुझ्या पाऊली ।
या कारणे साउली । न संडी तुझी ।।

गहिनीनाथानी संक्रमित केलेल्या दीक्षेमुळे ज्ञानेश्वर एवढे बोलू धजले.

गहिनीनाथानी दिलेल्या दीक्षेचा हा परिणाम मला फार फार भावून गेला.

आता ज्ञानेश्वर साधे राहिले नव्हते याचे ते प्रत्यंतर होते. पण अजून साऱ्या समाजाला ते उमगले नव्हते. अशीच आठ वर्षे गेली.

ही चारी भावंडे समाजाचा रोष सहन करीत कोणालाही दूषणे न देता आपल्या स्वानंदात मग्न असत. पण काही वेळेला समाजाला चटके देणे आवश्यक असते. चमत्काराशिवाय समाज नमस्कार करीत नसतो. ही चारी भावंडे अशी स्वानंदात मग्न असली तरी समाजाला त्याचे भान नव्हते.

शके १२०९ समाप्तीकडे झुकले होते. माघ महिना नुकताच प्रारंभला होता आणि या चार भावंडांच्या शुद्धतेचा विचार करण्यासाठी

पैठणमध्ये शास्त्री पंडित एकत्र जमले होते. पंचमी तिथी उजाडली आणि एक अप्रूप घडलं. साऱ्या समाजाची हेटाळणी सहन करीत ज्ञानेश्वर पंडितांच्या सभेपुढे निश्चल उभे होते. येणाऱ्या झंजावाताला टक्कर देण्याचे सामर्थ्य होतेच. त्याच सामर्थ्याने त्या रोंरावणाऱ्या वादळाला त्यांनी उधळून लावले आणि प्रसन्नचित्ताने महिषामुखी वेद घोषविले.

पंचमीची चंद्रकोर शांतपणे अमृतवर्षाव करीत होती साऱ्या भावंडाना शुद्धीपत्र देण्याची आपली पात्रता नाहीं हे शास्त्री पंडितानीं मान्य केले. आपल्या सहोदराने केलेल्या या चमत्काराने निवृत्तीस परम संतोष झाला.

ज्ञानेश्वरानी पुन: एक साहित्यिक चमत्कार केला. नेवासे येथे भगवद्गीतेवर टीका लिहिली आणि भावार्थदीपिका म्हणजे ज्ञानेश्वरी अवतरली. भावार्थदीपिका प्रज्वलित झाली. चांगदेवाना उपदेश दिला अमृताचा अनुभव घेतला आणि ज्ञानेश्वराना वाटू लागले संजीवन समाधी घ्यावी म्हणून.

ज्ञानेश्वरांच्या संजीवन समाधीचा सोहळा संपन्न झाला. ज्ञानेश्वर मुक्त झाले पण सोपान आणि मुक्ताबाईना हे पेलवले नाहीं.

मार्गशीर्षातच सोपान निजधामी गेला. मुक्ताई आणि सोपान यांच्यात वयोमानानुसार अधिक जिव्हाळा. ज्ञानेश्वर आणि सोपान हे आपल्यास सोडून गेले हे मुक्ताईला फार लागले.

निवृत्ती आणि मुक्ताई आपेगावी येण्यास निघाले. आपेगावच्या मूळ पुरुषाकडे त्र्यंबकरावांच्या संन्निध यावे असे तिला वाटू लागले. तिथे येताच तिचा कळवळा वाढला आणि वैशाख वद्य द्वादशीस तिने आपली उदासीनता कायमची संपविली.

तिची उदासीनता ती निजधामाला गेल्याने संपली. पण निवृत्तीची या भावांच्या जाण्याने वाढू लागली. आता मागे कोणताच व्याप

उरला नव्हता. उरला होता तो संताप. त्यामुळे पुढे जाण्याची आवश्यकता उरली नव्हती.

जिथे ज्ञान मिळाले तिकडे येणे आवश्यक वाटू लागले. जिथून प्रारंभ तिथे विश्राम घेणे योग्य. वर्तुळ पूर्ण होणे हा विधीनियम. म्हणून निवृत्ती मागे फिरले.

निवृत्तीची पावले पुन: त्र्यंबकेश्वराकडे वळली. ब्रह्मगिरी साद घालत होता. मी कुशावर्त-त्यांची आतुरतेने वाट पहात होतो, गंगाद्वार त्यांच्या भेटीस असुसलेले होते. त्र्यंबकेश्वरास त्यांची ओढ लागली होती.

निवृत्ती त्र्यंबकेश्वरी आले. अन् विनवू लागले–

निवृत्तीराज म्हणे । भलें केलें देवा ।
आता जी केशवा । सिद्ध व्हावे ।।
पार माझा प्राण । आला असे कंठीं ।
आता जगजेठी । सिद्ध व्हावे ।।

कारण काय असे पुसताच ते म्हणायचे–

ज्ञानराजें अमुचे । निर्वाविले डोळे ।
आता ऐसे खेळे । नाही कोणी ।।

निवृत्तीनाथ उदास भासत होते. रोज माझ्या संन्निध येऊन बसायचे. माझ्या जलात स्नान करायचे असे करता करता ज्येष्ठ वद्य एकादशी उजाडली. साऱ्यानी उपवास केला. द्वादशी उजाडली. द्वादशीचे पारणे सर्वांनी सोडले.

त्याना आता सारे जग शून्य भासत होते.

शून्य !

परब्रह्माचं स्वरूप !!

त्याचीच ओढ लागली.

आम्ही सारे आनंदी होतो. कारण ज्ञानेश्वरांची कीर्ती इथल्या परिसराने कैकमुखानी ऐकली होती. या ज्ञानेश्वरांचे गुरु आमच्या सन्निध आले होते. ते आमच्या संगतीत आले होते याचा आम्हाला आनंद होता.

पण हा आनंद फार काळ टिकायचा नव्हता. कारण एके दिवशी निवृत्ती म्हणाले–

> **ज्येष्ठाच्या आधी । कनिष्ठाने जाणे ।**
> **केले नारायणे । उफराटे ।।**

ज्ञानेश्वरांच्या निर्वाणामुळे त्यांना खंत लागली होती. या खंतीतच ते निर्णयाप्रत आले. आणि–

> **निवृत्तीराज बैसले । समाधी सुचित ।**
> **चिन्मय ते ज्योत । उजळली ।।**
> **पुंडलिके मिठी । निवृत्तीच्या गळा ।**
> **अवघियांच्या डोळा आसुवे येती ।।**
> **विठोबांचे हृदय । आलेंसे भरून ।**
> **झाकियेलें नयन । निवृत्तीराजे ।।**

झाले.

साऱ्या अनुजाना मन:शांती देऊन त्यांनी सर्वात शेवटी समाधी घेतली.

मी स्फुंदू लागलो. त्र्यंबकेश्वर हळहळला.

गंगाद्वार स्तब्ध झाले.

ब्रह्मगिरी आजही मौन धरून आहे. निवृत्तीनाथ गेले आणि मुमुक्षूंची गर्दी कमी होऊ लागली. विपरीत काळ येण्याची ती जणू चाहूल होती.

आम्ही म्हणत होतो–

ज्येष्ठाच्या आधी । कनिष्ठाने जाणे ।
केले नारायणे । उफराटे ।।
उफराटे फार । कळले माझे मनी ।
वळचणीचे पाणी । आढ्या गेले रे ।।

होय,

आम्ही आजसुद्धा तेच अनुभवतोय.

‘ वळचणीचे पाणी आढ्या गेले रे !’

८०१

संत शब्दाचा रूढ अर्थ सत्पुरुष असा आहे.

एके सत्पुरुषाः परार्थघटकाः स्वार्थपरित्यज्य ये ।

या वचनाप्रमाणे सत्पुरुष हे स्वार्थाचा परित्याग करून दुसऱ्याचा कार्यरूप अर्थ संपादन करणारे आहेत.

तात्पर्य ते परमार्थ संपादन करून पूर्ण झाले आहेत.

तथापि ते केवळ सुंदर स्वभावामुळे परावर उपकार करीत असतात.

अशा संतांचा आणि सामान्य जनांचा

उपकार्य उपकारभाव संबंध आहे.

म्हणून ज्यांना आपला उत्कर्ष अथवा उद्धार करून घ्यावयाचा आहे त्यांनी संतांच्या संगतीत रहावे.

ते उपदेश देत नाहीत.

तथापि त्यांच्या गोष्टी ऐकाव्यात.

त्या गोष्टीच उपदेश होतात.

आणि त्याप्रमाणे वर्तन करून मानव आपला

उत्कर्ष संपादन करू शकतो.

साक्षात् अशा संतांचा समागम घडला नाही तरी संतांची चरित्रे हे कार्य करण्यास समर्थ असतात.

म्हणून मानवाने संतचरित्राचा आदर करावा.

इति शिवम् ।

पं. श्रीपादशास्त्री जेरे